cmyk

## संपादकीय

### आकड्यांचा खेळ करीत मेळ बसविण्याचा प्रयत्न

आकड्याच्या घोषणेपासून दूर राहणाऱ्या शरद पवारांनी पहिल्यांदाच 'अबकी बार २२५ पार' ही घोषणा दिली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात एकच पक्षाला अर्थात काँग्रेसला २०० हून जास्त जागा मिळण्याचा प्रसंग दोन वेळा आला होता. १९६७ आणि १९७२ मध्ये वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली अनुक्रमे २०३ आणि २२२ जागा आल्या होत्या.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### कार्यक्रम रद्द करत अजितदादा विशाळगडाच्या पायथ्याला

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ले विशाळगडवर १४ जुलै रोजी झालेल्या हिंसाचारानंतर चार दिवसांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार पुण्यातील सर्व कार्यक्रम रद्द करून विशाळगडच्या पायथ्याशी पोहोचले. अजित पवार यांनी हिंसाचारग्रस्त भागाची पाहणी करत पीडितांशी संवाद साधला. पीडितांनी झालेल्या नुकसानाची माहिती देताना कोणत्या पद्धतीने हल्ला करण्यात आला याचा भयावह अनुभव सांगितला. यावेळी विशाळगडावरील महिला सुद्धा अजित पवार यांच्या भेटीसाठी गजापुरात पोहोचल्या. यावेळी महिलांनी सुद्धा आपल्या वेदनांना अजित पवार यांना कथन केल्या.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-८९ | शुक्रवार दि.१९ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# कांदा चाळीतील अनुदानात बदल!

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारने लोकसभा कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विरोधातील आदेश काढल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. महायुती सरकारने कांदा चाळींना दिले जाणारे वैयक्तिक स्वरूपाचे अनुदान बंद करत अनुदान योजनेत बदल केला आहे. त्यामुळे आता राज्यातील कांदा उत्पादकांसह कांदा उत्पादक संघटना आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून सरकारने हा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी कांदा उत्पादक संघटना आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. तसेच सरकारने निर्णय मागे न घेतल्यास तीव्र आंदोलन उभारू, असा इसारा देखील यावेळी देण्यात आला आहे.**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा निर्णय घेतला आहे. राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सतत पडणाऱ्या भावामुळे आणि केंद्र सरकारच्या निर्यात बंदीच्या निर्णयामुळे अडचणी आला आहे. याचा फटका सत्तेत असणाऱ्या महायुतीला लोकसभेत बसला होता. आता मात्र सरकारमधील सत्ताधाऱ्यांना या फटक्याचा विसर पडल्याचे दिसत आहे. सत्ताधाऱ्यांनी पुन्हा एकदा कांदा उत्पादकांच्या हिताविरोधातील निर्णय घेताना रोजगार हमी योजनेंतर्गत (रोहयो) कांदा चाळींना वैयक्तिक स्वरूपातील मिळणारे अनुदान बंद केले आहे. तर वैयक्तिक ऐवजी सामूहिकरित्या शेतकरी गटांना कांदा चाळींसाठी अनुदान देण्याचा आदेश काढला आहे. यामुळे आता वैयक्तिक स्वरूपात कांदा चाळींसाठी अनुदान मिळणार नाही. बचत गट किंवा शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या चाळींसाठी अनुदान घ्यावे लागणार आहे. कांदा चाळ अनुदान बंद केल्यानंतर पान २ वर

### शेतकऱ्यांमध्ये नाराजी

*रोहयो अंतर्गत कांदा चाळीसाठी सरकारकडून वैयक्तिक स्वरूपात अनुदान दिले जात होते. ज्याचा फायदा शेतकऱ्यांना कांदा साठवून ठेवण्यासाठी होत होता. तर ज्यावेळी कांद्याला भाव मिळेल तेंव्हा बाहेर काढला जात होता. मात्र आता अनुदान बंद झाल्याने वैयक्तिकरित्या कांदा चाळीसाठी अनुदान लाभ मिळणार नाही. यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये पुन्हा एकदा नाराजी निर्माण झाली असून याचा फटका सरकारला बसू शकतो.*



### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक...

*कांदा प्रश्नावर मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तर या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह कृषी मंत्री धनंजय मुंडे उपस्थित असतील. तसेच कृषी, पणन आणि उद्योग विभागाचे अधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत. तर या बैठकीत राज्यातील कांदा प्रक्रिया आणि साठवणुकीच्या संदर्भात चर्चा होणार आहे. सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची या बैठकीत काय निर्णय होतो याकडे नजरा लागल्या आहेत.*

## ठाकरे गटालाही राजकीय निधी स्वीकारता येणार

### विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठा दिलासा

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दिलासा मिळाला आहे. पक्षाला आता राजकीय निधी स्वीकारता येणार असल्याची परवानगी निवडणूक आयोगाने गुरुवारी (दि.१८) दिली. यामुळे शिवसेना (उबाठा) पक्षाला सरकारी कंपनी व्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्ती किंवा कंपनीतर्फे राजकीय निधी स्वेच्छेने स्वीकारता येणार आहे. मात्र ही परवानगी अंतरिम असल्याचे निवडणूक आयोगाने नमूद केले आहे.**

शिवसेना फुटीनंतर उद्धव ठाकरेंच्या पक्षाला राजकीय निधी स्वीकारण्याची परवानगी नव्हती. ही परवानगी मिळावी यासाठी पक्षाने निवडणूक आयोगाला १० जूनरोजी एक पत्र लिहून मागणी केली होती. त्या पत्राचा विचार करुन आयोगाने हा निर्णय घेतला असल्याचे म्हटले आहे. लोकप्रतिनीधी कायदा १९५१ च्या कलम पान २ वर

# बीडचा आवाज आता देशात घूमणार!

## राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी धनंजय मुंडे



**पुणे । प्रतिनिधी**

**आता सर्वच पक्ष विधानसभेच्या निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. अजितदादांच्या टीममधील खास नेते असलेले कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पक्षातील एक महत्त्वाची नवीन जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी ही घोषणा केली. आता धनंजय मुंडे यांच्यावर राष्ट्रीय जबाबदारी आल्याने बीडचा आवाज आता देशभरात घूमणार आहे. होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकिच्या पार्श्वभुमीवर हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे.**

अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी गुरूवारी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी काही महत्त्वाची माहिती दिली. पुढे तटकरे म्हणाले, सोमवार दिनांक २२ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अहिल्यानगर दौरा निश्चित करण्यात आला असून या दौऱ्यात महिलांशी थेट संवाद साधणार असल्याचा पान २ वर

### स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रमाणेच धनंजय मुंडे यांना संधी

बीड जिल्ह्याने राज्य आणि देशाचे नेतृत्व करणारी व्यक्तिमत्वे यापूर्वी दिली आहेत. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी अख्या ओबीसीचे नेतृत्व करताना राज्यासह देशभरात आपला ठसा उमटविला होता. तशीच संधी धनंजय मुंडे यांना मिळाली आहे. राज्यामध्ये त्यांचे मोठे वलय आहेच मात्र आता देशभरामध्ये नेतृत्व करण्याची संधी त्यांना लाभणार आहे. विशेष करून देशभरातील ओबीसी समाजाचे नेतृत्व करण्याची धमक त्यांच्यात आहे. आतापर्यंत प्रत्येक संधीचे सोने करीत आलेले धनंजय मुंडे याही वेळी आपली जबाबदारी अत्यंत कुशलपणे पार पाडतील यात शंका नाही.

### पैशाची मागणी केल्यास तुरुंगात टाका - मुख्यमंत्री

मुंबई : शासन गोरगरीब, सर्वसामान्यांना लाभ मिळावा यासाठी योजना राबवत असते. अशा घटकांकडून पैसे काढणे हे योग्य नाही, त्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा कठोर इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या नाव नोंदणीसाठी अनेक ठिकाणी पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे प्रकार समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हा इशारा दिला आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या सात महत्वाकांक्षी योजनांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत पान २ वर

## नीट परीक्षा वादावर आता सोमवारी फैसला

**दिल्ली। वृतसंस्था**

वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर गुरूवारी (दि.१८) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. विद्यार्थ्यांनी मिळवलेले गुण त्यांच्या वेबसाइटवर विद्यार्थ्यांची ओळख गुप्त ठेवावी आणि शहर व केंद्रानुसार निकाल स्वतंत्रपणे जाहीर करावा. तसेच बिहार पोलिसांनी आपल्या तपास अहवालाची प्रत सादर करावी, असे निर्देश देत या प्रकरणी पुढील सुनावणी सोमवार, २२ जुलै रोजी होईल, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. दरम्यान, आजच्या सुनावणीत पेपरफुटी व्यापक प्रमाणावर झाली असेल तरच फेरपरीक्षा होईल, असा पुन्नरुच्चार पान २ वर




## विशाळगड येथील दुर्दैवी घटना सरकार पुरस्कृत

### जिल्हाधिकाऱ्यांची बदली तर जिल्हा पोलीस प्रमुखांना तात्काळ निलंबित करा, विजय वडेट्टीवार यांचा हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड येथे अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली समाजकंटकांनी विशिष्ट समाजाला लक्ष करून घातलेला हैदोस निंदनीय आहे. विशाळगड येथील गजापूर येथे घडविलेली समाजविघातक घटना ही शासन पुरस्कृत असल्याने या घटनेमागील खरा सूत्रधार सरकारने समोर आणला पाहिजे, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर सडकून टीका करत या दुर्देवी घटनेचा निषेध केला.



विजय वडेट्टीवार म्हणाले की, जिल्हा पोलीस प्रमुख आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे प्रकरण घडले आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांची तात्काळ बदली करावी, जिल्हा पोलीस प्रमुखांना तात्काळ निलंबित करावे, नुकसानग्रस्तांना सरकारने मदत करावी, हल्लेखोरांना पाठीशी न घालता या प्रकरणाची सरकारने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली.


कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड येथे घडलेल्या दुर्देवी घटनेच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रचितीगड या शासकीय निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार वर्षा गायकवाड, माजी मंत्री नसीम खान, पान २ वर

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात भूकंप वैज्ञानिक वेधशाळा होणार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाडा विभागासाठी कायमस्वरूपी भूकंप वैज्ञानिक वेधशाळा उभारण्यात येणार असून, केंद्र शासनाच्या पृथ्वी व विज्ञान मंत्रालयाने यासाठी जिल्हा प्रशासनाकडे तळमजल्यावर १२ फूट बाय १० फूट आकाराची जागा मागितली आहे. वाहनांच्या वर्दळीपासून शांत अशा ठिकाणी ही जागा मिळावी, यासाठी नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीचे (एनएससी) शास्त्रज्ञ रविकांत सिंह यांनी जिल्हा प्रशासनाला नुकतेच पत्र पाठविले आहे. ट्रॅफिक, हाय-टेन्शन पॉवर लाइन्स, रेल्वे ट्रॅक, जड उद्योग युनिट्स, पॉवर जनरेटर नसलेली जागा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रशासनाकडे पत्रातून करण्यात आली आहे.**

पान २ वर





## जीप विहिरीत कोसळून ७ वारकरी ठार

### जालना-राजूर मार्गावरील घटना

**जालना । वृतसंस्था**

जालना ते राजूर रोडवरील तुपेवाडी फाट्याजवळ एका विहिरीत काळी पिवळी जीप कोसळून भीषण अपघात झाला. या दुर्देवी घटनेत ७ प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. ही घटना गुरूवारी (दि.१८ ) सायंकाळी साडे पाच वाजता घडली.या अपघातील बहुतांश प्रवासी हे पंढरपूर पान २ वर





### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१६ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : ६.०० क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२९७ |
| ज्वारी/हायब्रिड : ५४.०० क्विंटल | २,११५ | २,९७० | २,३५९ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,८०१ | ८,८०१ | ८,८०१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: ४२.०० क्विंटल | २,४४० | ३,२५५ | २,७२१ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १५.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,३७६ | ६,५०१ | ६,४२४ |

# तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

## हवामान विभागाची माहिती; १९ ते २१ जुलै दरम्यान यलो आणि रेड अलर्ट

**पुणे । प्रतिनिधी**

**मागील पाच दिवसात राज्यातील बहुतांष जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने यलो आणि रेड अलर्ट जारी करत मुसळधार पावसाचा इशारा दिला होता. याही आठवड्यात नैऋत्य मौसमी वारे मान्सूनच्या अनुषंगाने राज्यासाठी सकारात्मक असल्याने या चालू आठवड्यातील चार दिवस राज्यातील बहुतांश जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.**



प्रामुख्याने राज्यातील ठाणे, मुंबई, पालघरला १९ जुलै रोजी या तिन्ही जिल्ह्यासाठी आणि पुढील दोन दिवसांसाठी ठाण्याला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. शिवाय मुंबई, पालघर आणि रायगडसाठी मुसळधार पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला पहिले तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मात्र २१ तारखेला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, आदी जिल्ह्यांना २० आणि २१ जुलै रोजी यलो अलर्ट जाहिर करण्यात आला आहे. तर पुणे जिल्ह्याला सलग तीन दिवसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. कोल्हापूर जिल्ह्याला १९ ते २१ जुलै दरम्यान यलो अलर्ट, साताऱ्याला २१ जुलै रोजी, संभाजी नगरला २० आणि २१ जुलै रोजी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. जालना जिल्ह्याला १९ आणि २१ जुलै रोजी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच परभणी जिल्ह्यालाही १९ आणि २१ जुलै, बीडला २० आणि २१ जुलै रोजी, नांदेड जिल्ह्याला १९, २० जुलै रोजी, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांना २० जुलै रोजी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ आदी जिल्ह्यांना १९ ते २१ जुलै असे तीनही दिवस यलो अलर्ट हवामान खात्याने जारी केला आहे.

cmyk

## अग्रलेख

# आकड्यांचा खेळ करीत मेळ बसविण्याचा प्रयत्न

आकड्याच्या घोषणेपासून दूर राहणाऱ्या शरद पवारांनी पहिल्यांदाच 'अबकी बार २२५ पार' ही घोषणा दिली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात एकच पक्षाला अर्थात काँग्रेसला २०० हून जास्त जागा मिळण्याचा प्रसंग दोन वेळा आला होता. १९६७ आणि १९७२ मध्ये वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली अनुक्रमे २०३ आणि २२२ जागा आल्या होत्या. आज ५२ वर्षांनी त्या विक्रमाला गवसणी घालण्याची घोषणा शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या महाआघाडीचे कर्तेकरविते शरद पवार यांनी वयाच्या ८४ व्या वर्षी केली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपच्या 'अबकी बार चारसौ पार' या घोषणेला खीळ घालण्याचे मुख्य काम ज्या दोन राज्यांत घडलं त्यापैकी एक महाराष्ट्र तेही पवारांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीमुळे ३१ जागा जिंकून. लोकसभेच्या ३१ म्हणजे विधानसभेच्या १८६ हे गणित लक्षात घेऊनच पवारांनी २२५ पारची घोषणा केली. १८ व्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या पक्षाने केवळ दहा जागा लढवून आठ जागा जिंकल्या आहेत.

विरोधकांनी दिलेल्या घोषणेचा पलटवार त्यांच्यावरच याहीपूर्वी पवारांनी केला आहे. १९९० साली शिवसेना-भाजप युतीच्या प्रचारात घोषणा होती 'एकच लक्ष्य विधानसभा!' चित्र असायचं विधानसभेकडे अंगुलीनिर्देश करून दाखवणारे बाळासाहेब ठाकरे. निवडणूक प्रचारात आघाडी घेणारी युती ९४ वर थांबली आणि १४१ जागा जिंकून शरद पवार सत्तेवर आले. त्यावेळी एका सत्कार समारंभात एक होर्डिंग लावलं होतं ज्यात पवार विधानसभेकडे अंगुलीनिर्देश करून म्हणत होते, 'एकच लक्ष विधानसभा!' आज 'अबकी बार २२५ पार' ही घोषणा देऊन भाजपच्या 'अबकी बार चारसौ पार' या घोषणेला उत्तर देत आहेत.ज्या प्रकारची घोषणा पवारांनी केली आहे ती पाहता पवार विधानसभेच्या जागावाटपात स्वतःच्या पक्षाला कमी जागा घेतील असं वाटत नाही. उलट तीन पक्षांच्या आघाडीत तिन्ही पक्षांना प्रत्येकी ९६ जागा मिळाव्यात आणि मुख्यमंत्रिपद सर्वात जास्त जागा मिळविणार्या पक्षाच्या नेत्याला मिळावं यासाठी ते आग्रही असू शकतात. तीन पक्षांच्या महाविकास आघाडीला जर २२५ पार जायचं असेल तर या तीनही पक्षांना प्रत्येकी ७० ते ७५ जागा जिंकाव्या लागतील आणि ते अशक्य वाटतं. त्यातून जर तेवढ्या जागा जिंकून मविआ २२५ पर्यंत पोहोचली तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र येऊन जर १४५चा आकडा गाठू शकले तर ते शिवसेनेला दूर ठेवून सरकार बनवू शकतील. अशावेळी महाराष्ट्रात नितीशकुमारांची भूमिका वठवत पुन्हा भाजपचा हात धरण्याचा विचार करू शकतात.सहा पक्षांत विभागल्या गेलेल्या महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच राजकीय पक्षांना आगामी निवडणुकीसाठी आपल्या नेत्याचा चेहरा मुख्यमंत्री म्हणून असावा याची ओढ लागली आहे. सहापैकी पाच पक्षांच्या अतिउत्साही कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी आपापले उमेदवार भलेही समोर केले असले, तरीही शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे कार्यकर्ते या रेसपासून दूर आहेत किंवा पवारांनी त्यांना दूर ठेवलं आहे. मात्र, आगामी निवडणुकीनंतर येणारं सरकार बनविण्यात शरद पवारांची भूमिका महत्त्वाची असेल! महाराष्ट्राला पहिली 'महिला' मुख्यमंत्री मिळावी म्हणूनच की काय भावी मुख्यमंत्र्यांचा चेहरा देण्याच्या या रेसमध्ये राष्ट्रवादी उतरली नाही. शरद पवारांची राजकीय खेळी सुरू होईल निवडणुकीनंतर! ही खेळी पवार याआधी १९८६ मध्ये खेळले होते. पंचावन्न आमदार असलेला आपला पक्ष त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन केला आणि त्यानंतर दीड वर्षात त्यांना मुख्यमंत्री करण्यात आलं. आताही लोकसभेतील राष्ट्रवादीचे आठ खासदार आणि नव्याने निवडून आलेल्या आमदारांच्या भरवशावर पवार काँग्रेसची वाट धरू शकतात. कारण त्यामुळे लोकसभेत काँग्रेसची सदस्यसंख्या १०७ होईलच तसेच १९८५ नंतर प्रथमच महाराष्ट्रात पूर्ण बहुमताचं काँग्रेस सरकार येऊ शकेल.मध्य प्रदेशात भाजपसाठी गेम चेंजर ठरलेली मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरलेली 'लाडकी बहीण योजना' महाराष्ट्रात जाहीर झाली असली तरीही त्याचा महाराष्ट्रातील महायुती सरकारला लाभ मिळेल असं वाटत नाही. कारण जनतेच्या मनात या योजनेची महाराष्ट्रात घोषणा करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या भगिनी सुप्रिया यांचे सध्याचे ताणलेले संबंध आणि भगिनीच्या पराभवासाठी आपल्या पत्नीला निवडणुकीत उतरवणारे अजित पवार लक्षात आहेत. तीच गोष्ट एकनाथ शिंदे यांची कारण, लोकांना 'वर्षा' या मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावरून राजीनामा देऊन बांद्र्यातील आपल्या मातोश्री बंगल्यावर परतणारे उद्धव लक्षात आहेत. त्याचा प्रत्यय लोकसभेत आला आहेच. आणि त्याच्याच भरवशावर पवार २२५ पार च्या घोषणा करीत आहेत. अर्थात, हा आकडा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढविण्यासाठी असतो. पण तरीही माविआ २२५ पार जरी नाही तरी १७५ ते २०० च्या आसपास राहील, असं वाटतं. त्याचबरोबर तुटपुंजे आमदार निवडून येणार्या अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षांना भाजपमध्ये विलीन होणे हाच मार्ग असेल. आणि महाराष्ट्रात काँग्रेस, भाजप हे दोन प्रमुख पक्ष राहतील, तर तिसरा पक्ष उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना राहील असा अंदाज बांधण्यास जागा आहे.

# विद्यार्थ्यांनी केला गुणवंत शिक्षक खेमगर सरांचा वाढदिवस

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**पूर्वीच्या काळात शिक्षण घ्यायचे असेल गुरुकुल पद्धत ही अवलंबिवली जायची परंतु जसे जसे जग बदलत गेले तशी तशी आधुनिक पद्धत समोर येऊन शिक्षण पद्धतीतही बदल झाले मात्र जगातील कोणत्याही बदलापुढे न जाता गुरु शिष्याचे एक अतूट नाते आजही कायम असून याचीच प्रचिती म्हणून गुरुवार दिनांक १८ जुलै २०२४ रोजी आष्टी तालुक्यातील मातकुळी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये पाहायला मिळाली.गुरूर्ब्रमहा, गुरूर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरा!गुरु:साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः गुरूप्रतीअसलेले प्रेम, गुरू म्हणजे देव आणि गुरुप्रती असलेल्या मंत्रांचे पठण करुन देवासमान असलेल्या आपल्या गुणवंत शिक्षक खेमगर सरांचा वाढदिवस येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला.**





गुरूवार दिनांक १८/५/२०२४ रोजी नियमीत शाळेच्या वेळेनुसार शाळा भरली आणि प्रार्थना व परिपाठ झाल्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी शिस्तप्रिय व गुणवंत शिक्षक खेमगर सरांचा वाढदिवस केक कापुन व शाल श्रीफळ पुच्छगुच्छ देऊन सत्कार केला यावेळी विद्यार्थ्यी व शिक्षकांनी वाढदिवस साजरा केल्याबद्दल खेमगर सरांनी भावनिक होऊन आभार मानले तसेच विद्यार्थ्यांचे यश हीच आपली मानसिकता असुन विद्यार्थ्यांना घडवणे हेच आपले ध्येय असून विद्यार्थ्यांनी यश संपादन केले तरच मनाला आनंद वाटतो तसेच विद्यार्थ्यांचे यश हिच गुरुची गुरूदक्षिणा असते जो पर्यंत ज्ञानदानार्जाचे काम करील तो पर्यंत प्रामाणिक करेल आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना यशाच्या रांगेत पाहील असे मत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला सरपंच बबन दादा डोके, उपसरपंच विशाल आबा जरे, डॉ. आप्पा डोके, पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, बंकट पाचबैल, अनील डोके, श्रीराम जरे, जेष्ठ शिक्षक सिताराम माने, महाव्दार सर, गळगटे सर, नागरगोजे सर, श्रीमती डमाळे मॅडम, दिपक वीर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# माजलगावचा पाणीपुरवठा सुरळीत करा

- **सतत गैरहजर असलेल्या मुख्याधिकाऱ्यांनी पाणीप्रश्न सोडवावा**
- **अन्यथा आंदोलन करू – भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांचा इशारा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

**मागील सहा दिवसांपासुन माजलगाव शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला असुन शहरवासीयांचे हाल होत आहेत. अशा परिस्थितीत पालिकेचे मुख्याधिकारी हे सतत गैरहजर असतात व बोगस बिले काढण्यात ते मशगुल आहेत. त्यामुळे तात्काळ पाणीप्रश्न सोडवा अन्यथा भाजपाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी दिला आहे.**



मागील सहा दिवसांपासुन शहराचा पाणीपुरवठा कर्मचा-यांच्या अचानकच्या संपामुळे बंद आहे. भर पावसाळ्यात शहरवासीयांना पाण्याकरीता भटकंती करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाचा निष्क्रीयपणा पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. पाणीपुरवठ्यासोबतच शहरात अस्वच्छता पसरली असुन पथदिवे देखिल बंद आहेत. या सर्व कामांचे टेंडर असतांना देखिल शहरवासीयांना मात्र पाणी, विज, पथदिवे, स्वच्छता या मुलभूत सुविधांपासुन वंचित रहावे लागत आहे. पालिकेचा कार्यकाळ संपलेला असुन मुख्याधिकारी हे प्रशासक आहेत परंतु मुख्याधिकारीच गैरहजर असल्याने विवीध कामे खोळंबली असुन कर्मचा-यारी देखिल सतत गैरहजर असतात त्यामुळे त्यांचेवर कुणाचाही वचक राहिलेला नसुन याप्रश्नी मुख्याधिका-यांनी तात्काळ लक्ष घालुन पाणीप्रश्नासह मुलभुत सुविधा तात्काळ पुरवाव्यात अन्यथा भाजपाच्या वतीने पालिका प्रशासनाचा निषेध करत तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपाचे जेष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी दिला आहे.

# आष्टीचे तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी बांधावर जाऊन केली पीक पाहणी

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यामध्ये गेल्या दहा दिवसापासून दररोज पाऊस पडत आहे तसेच दररोज ढगाळ वातावरणामुळे खरीप हंगामातील पिकावर रोग पडलेला आहे. पिकावर बुरशी व कीटकांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांनी तात्काळ फवारणी करून घेण्याचे आवाहन आष्टीचे तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले आहे.**



त्यांनी गुरुवारी कडा परिसरात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पीक पाहणी केली असता उडीद पिकावर खोडमाशी व कीटकांचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले आहे. तसेच कापसावर थ्रिप्स मोठ्या प्रमाणात असल्याने कापसावर रस शोषककिडे ही मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. तुरीवर सुद्धा मोठ्या प्रमाणात ढगाळ वातावरणाचा परिणाम झाला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. आष्टी तालुक्यामध्ये यावर्षी मृग नक्षत्रात पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत. तालुक्यामध्ये जवळपास ९८ हजार हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली असून त्यामध्ये प्रामुख्याने उडीद या पिकाचा समावेश आहे. तसेच कापूस, बाजरी ,तूर, मूग ,,मका,सोयाबीन इत्यादी पिकांची ही यावर्षी वेळेवर पेरणी झाल्याने पिके चांगली आहेत. परंतु गेल्या दहा दिवसापासून आष्टी तालुक्यामध्ये सतत रिमझिम व मोठा पाऊस पडत आहे. त्याचबरोबर तालुक्यामध्ये ढगाळ वातावरणामुळे पिकावर बुरशी व कीटकांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी लवकरात लवकर फवारणी करून घ्यावी व आपल्या पिकाचे संरक्षण करावे .प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क करून पिकाच्या परिस्थितीनुसार औषधाची फवारणी करावी असे आवाहन तरटे यांनी केले आहे.

# कऱ्हेवाडी येथील हरिनारायणस्वामी विद्यालयात रंगला आषाढीनिमित्त दिंडी सोहळा

**आष्टी । प्रतिनिधी**

आषाढीवारीनिमित्त पंढरीत ३० लाख वारकरी दर्शनासाठी आले होते.पंढरीत शाळकरी विद्यार्थ्यांना जाता येत नाही म्हणून शाळेत जाऊन पायी दिंडी आयोजित करुन भक्तीभाव वाढवावा यासाठी हरिनारायण स्वामी विद्यालयाने विद्यार्थ्यांना वारकरी वेशात आणुन गावभर दिंडी मिरवणूक केली.यात माता,पुरुष पालक सहभागी झाले होते. वारकरी संप्रदायाची टाळ-मृदंग दिंडी महाराष्ट्राची अध्यात्मीक ओळख आहे.हा ठेवा पुढील पिढीने जतन करावा.याउद्देशाने मुख्याध्यापक संतोष नवले सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ज्ञानोबा तुकाराम ...ज्ञानोबा तुकाराम या जयघोषाने दिंडी प्रदक्षिणा झाली.दिंडीत फुगड्या झाल्या.भक्तीमय वातावरणाने क-हेवाडी परिसर फुलला होता.दिंडीत सहभागी होतांना रामकृष्ण हरी,ज्ञानोबा माऊली...तुकाराम या नामगजराने दिंडीचा प्रारंभ झाला.या दिंडीत सर्व विदयार्थी-शिक्षक पालक सहभागी झाले होते. विठ्ठल रुक्मिणीची विद्यार्थी-विद्यार्थीनी विद्यालयापासून मिरवणूक काढण्यात आली.वेशीत आल्यानंतर सर्वांनी फुगड्यांचा मनसोक्त आनंद घेतला.दिंडीत सजावलेल्या माऊलींच्या पालखीचा समावेश होता.वेगवेगळ्या संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थी दिंडीचे आकर्षण ठरले.बालवारक-यांचे ग्रामस्थांनी ठिकठिकाणी स्वागत केले.आयोजीत दिंडीत ८ वी. ते १० वी. विद्यार्थीनी सहभाग घेतला. टाळमृदंगांनी,विठूनामांनी मार्ग निनादला. शिक्षीका श्रीमती बी.बी.धोंडे, शिक्षक पंजाब बांगर,भारत दळवी,संजय राऊत ,बाळासाहेब भोपळे,रामदास सांगळे यांनी नियोजन केले तर मुख्याध्यापक संतोष नवले सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक क-हेवाडी गावच्या सरपंच छाया गायकवाड,उपसरपंच बाळासाहेब सांगळे,ग्रामस्थ गोरख सांगळे,बबन सांगळे, सोमीनाथ सांगळे, राम सांगळे, नवनाथ सांगळे,बाजीराव सांगळे, नामदेव सांगळे,रामदास सांगळे, विद्यालयाचे माजी विद्यार्थी इतर ग्रामस्थ शिक्षक ,कर्मचा-यांची दिंडीत उपस्थिति होती.दिंडीत सहभागी मुलांना फळे वाटप करण्यात आली. वृक्षारोपन करुन दिंडीची सांगता करण्यात आली.



## पान १वरून...

### कांदा चाळीतील

कांदा पट्ट्यातील अनेक शेतकऱ्यांना याचा फटका बसू शकतो. तर चाळींना दिले जाणारे वैयक्तिक स्वरूपाचे अनुदान वाढण्याची गरज असून ते देण्यात यावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. मात्र शेतकऱ्यांची मागणी मान्य न करता सरकारने उलटा फेरा धरत कांदा उत्पादकांची निराशा केल्याची टीका संघटनेने केली आहे. तसेच प्रत्येक शेतकऱ्याला कांदा चाळ उभारण्यासाठी अनुदान देण्याची मागणी लावून धरली आहे. तर सरकारने हा निर्णय मागे न घेतल्यास आंदोलन करू असा इशारा देताना आगामी निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष दिसून येईल असेही स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं म्हटले आहे.

------------

### बीडचा आवाज आता

उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केला असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी तटकरे यांनी सध्या कॅबिनेट मंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांच्यावर आता नवीन आणि महत्त्वाची जबाबदारी देण्यात येत असल्याची घोषणा केली. राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या मान्यतेने राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची निवड केल्याचे तटकरे यांनी सांगितले. त्यासोबतच प्रदेश प्रवक्तेपदी नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर यांची निवड केल्याचीही घोषणा प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी यावेळी केली. लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला तर ४ पैकी केवळ १ जागा जिंकता आली. पण विधानपरिषदेच्या निवडणुकीत त्यांनी ते अपयश धुवून टाकले. राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे असे दोनही उमेदवार निवडून आणले. आता राज्याला विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. त्या पार्श्वभूमीवर सगळेच पक्ष आपापली रणनीती आखताना दिसत आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कडूनही जोरदार तयारी करण्यात येत आहे, त्याचाच एक भाग म्हणून अत्यंत फर्डा वक्ता असलेले आणि अभ्यासू म्हणून परिचित असलेले मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांच्यावर आतापर्यंत दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत कुशलपणे पार पाडल्या आहेत. अजित पवार यांची राष्ट्रवादी इतर राज्यातही जोमाने काम करीत आहे, अशावेळी राष्ट्रीय पातळीवर पक्षाची भूमिका अत्यंत परखड आणि सुव्यवस्थित मांडणाऱ्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाची गरज होती हे लक्षात घेऊनच धनंजय मुंडे यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीप्रमाणे जम्मू-काश्मीरमध्येही विधानसभा निवडणुका होणार आहेत. काश्मीरमध्ये राष्ट्रवादी आपले स्वतंत्र उमेदवार उभे करणार असल्याचे यापूर्वीच जाहीर झाले आहे. त्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांची जबाबदारी आणखी वाढली आहे.

------------

### विशाळगड येथील दुर्दैवी घटना

काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत उपस्थित होते. विजय वडेट्टीवार म्हणाले की, कोल्हापूर जिल्ह्यात पुरोगामी विचारांचा खासदार निवडून आल्याने जातीयवादी पक्षाच्या पायाखालची वाळू घसरली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अशा दुर्दैवी घटना घडविल्या जात आहेत. विशाळगड येथे आंदोलनाच्या नावाखाली तोडफोड करणारे शिवप्रेमी असूच शकत नाहीत. त्यामुळे हे हल्लेखोर कोण होते याचा सरकारने तपास केला पाहिजे. शेवटी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील कायदे सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत आहेत हे दुर्दैव आहे. विशाळगड येथे तोडफोड होत असताना पोलीसांचे हात कोणी बांधले होते याचा सरकारने खुलासा केला पाहिजे. रवी पडवळ खुले आम व्हीडीओवरून धमकी देतो पण त्याला सरकार का पकडत नाही असा सवाल देखील वडेट्टीवार यांनी केला आहे. त्याचबरोबर अतिक्रमणाचा प्रश्न सरकारने सुसंवादातून सोडविला असता तर दुर्दैवी घटना घडली नसती. परंतु सरकारला हा प्रश्न सोडवायचा नव्हता, अशा शब्दात त्यांनी सरकारचे वाभाडे काढले. तसेच यासंदर्भातील चौकशीच्या मागणीचे पत्र विजय वडेट्टीवार यांनी सरकारला पाठविले.

------------

### नीट परीक्षा वादावर

सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केला. परीक्षेमध्ये झालेले गैरप्रकार हे स्थानिक स्वरुपाचे आहेत, असा दावा करत पुन्हा नीट परीक्षा घेण्याच्या मागणीला केंद्र सरकारसह नॅशनल टेस्टिंग एजन्सी ( एनटीए) ने ८ जुलै रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान विरोध केला होता. यावेळी नीट परीक्षेतील गैरप्रकाराबाबत केंद्र सरकार आणि एनटीएने १० जुलैपर्यंत शपथपत्र दाखल करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. एनटीएने १७ जुलै रोजी न्यायालयात सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, परीक्षेत पद्धतशीर अनियमितता असल्याचा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्णपणे चुकीचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सीबीआयने या प्रकरणी न्यायालयात तपास अहवाल सादर करायचा होता. त्याची एक प्रत आम्हाला मिळावी, अशी मागणी मुख्य याचिकाकर्त्यांचे ज्येष्ठ वकील नरेंद्र हुड्डा यांनी केली. यावर सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणी सीबीआयने तपासातील तपशील उघड केला तर तपासात अडथळा येईल. यावेळी सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्यांना किमान किती गुण मिळाले आहेत? असा सवाल केला. यावर १ लाख ८ हजार उमेदवारांना प्रवेश मिळाला आहे. यामध्ये समावेश नसणाऱ्या १३१ विद्यार्थींनी पुनर्परीक्षेची मागणी केली आहे. १ लाख ८ हजारांमध्ये समावेश असणाऱ्या २५४ विद्यार्थी फेरपरीक्षेला विरोध करत आहेत, अशी माहिती सॉलिसिटर जनरल तुषार यांनी दिली.

------------

### जीप विहिरीत कोसळून ७

येथे आषाढी वारीसाठी गेले होते. तेथून ते बसने जालना येथे परतले व गावी परतत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. राजूर रोडवरील तुपेवाडी जवळ या जीप वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यालगतच असलेल्या विहिरीत जाऊन ही जीप कोसळली. ग्रामस्थ आणि पोलिसांकडून गाडीतील प्रवाशांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. यातील जखमींवर जिल्हा सामान्य रुणालयामध्ये उपचार सुरू आहेत.

------------

### छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात

नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी ही केंद्र शासनाची नोडल एजन्सी असून देशभरात भूकंपाच्या धक्क्यांचे चोवीस तास निरीक्षण करते. शास्त्रीयदृष्ट्या भूकंपाचा शोध घेण्यासाठी महाराष्ट्रात मोक्याच्या ठिकाणी चार मानवरहित भूकंप वैज्ञानिक वेधशाळा स्थापन करण्याची योजना एनएससीने आखली आहे; त्यापैकी एक वेधशाळा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. भूकंपविषयक वेधशाळा उभारण्यासाठी तांत्रिक आवश्यकतांमध्ये तळमजल्यावर विद्यमान इमारतीमध्ये विद्युतपुरवठा व इतर मूलभूत सुविधांसह १२० फूट आकाराची जागा मागितली आहे. मिळणाऱ्या जागेत ३ बाय ४ फूट आकाराचा काँक्रीटचा खांब जमिनीच्या खाली सुमारे १० फूट बांधला जाईल. त्याच्या वरच्या बाजूला सेन्सर्स असतील. टेरेसवर सौर पॅनेल बसविण्यात येतील. जागा देण्याचे निश्चित झाल्यानंतर एनएससीचे पथक पाहणी करतील. त्यात भूकंपाची माहिती देणारी महागडे उपकरणे असतील. त्यासाठी सुरक्षाव्यवस्था देण्यात येईल. त्या देखभालीचा खर्च एनएनसी उचलेल.

------------

### ठाकरे गटालाही राजकीय

२९ बी आणि २९ सी नुसार पक्षाला निधी स्वीकारण्याची परवानगी देण्यात आली. दरम्यान, निवडणूक आयोगाने यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार यांना महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन राजकीय निधी स्वीकारण्याची परवानगी दिली होती.

------------

### पैशाची मागणी केल्यास तुरुंगात

आढावा घेण्यात आला. या बैठकीस जिल्हास्तरीय विविध यंत्रणांचे अधिकाऱ्यांसह, संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त आदी उपस्थित होते. तसेच वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्य सचिवांसह विविध विभागांचे सचिवस्तरीय अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, योजनांच्या अंमलबजावणीत गैरप्रकार होऊ नये याची दक्षता घ्या. जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांनी यासाठी दक्ष राहिले पाहिजे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत कुणी महिला भगिनींकडून अर्जासाठी पैशांची मागणी केल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करा. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा,असे मुख्यमंत्री म्हणाले.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १८ जुलै २०२४



# घरफोडीतील साडेचार लाखांचा मुद्देमाल फिर्यादीस केला परत

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २१/०५/२४ यातील फिर्यादी मोहम्मद शकीद्दीन खाजा मोईनुद्दीन, राहणार कागदी दरवाजा खासबाग, देवी रोड , बीड. हे घरी नसताना त्यांच्या घरात घुसून अज्ञात आरोपीने कपाटात ठेवलेले साडेतीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे बिस्किट कपाट तोडून चोरून नेले होते. परंतु बीड शहरच्या डीबी पथकाने हा गुन्हा २४ तासाच्या आत उघडकीस आणून यातील आरोपी सय्यद रिहान सय्यद अब्दुल रजाक राहणार कागदी दरवाजा या तात्काळ अटक केले होते . यातील मुद्देमाल सोन्याचे बिस्किट त्यांनी हस्तगत केले होते ते बिस्किट आज रोजी फिर्यादीस सन्मानाने परत केले आहे. यातून परिसरातील लोकांनी पोलिसांच्या कामगिरीबद्दल कौतुक व्यक्त केले आहे. सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, मनोज परजणे, अशपाक सय्यद, सुशील पवार यांनी बालाजी मुळे यांनी पार पाडली आहे.

# ‘आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी’ उपक्रमातून १३ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**मुंबई । प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबवीत आहे. वारीमध्ये १७ जुलै पर्यंत १३ लाख ९६ हजार ०७२ वारकऱ्यांवर मोफत उपचार करण्यात आले आहेत. आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांची संकल्पना आणि मार्गदर्शनाखाली हा विशेष उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने राबविण्यात आला.

संत श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि राज्यातील सुमारे एक हजार दिंड्यांमध्ये सहभागी झालेले लाखो वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी आले. त्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला तर लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने सलग दुसऱ्या वर्षी 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम हाती घेतला होता. प्रत्येक पाच किलोमीटरवर एक आपला दवाखाना तयार करण्यात आला होता. वारी दरम्यान ६ हजार ३६८ आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांनी वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविल्या. तात्पुरत्या रुग्णालयात दाखल करून २,३२७ रुग्णांवर उपचार करण्यात आले. पालखी आणि दिंडी मुक्कामी असणाऱ्या ठिकाणी




५ खाटांचे तात्पुरते अति दक्षता विभाग (आयसीयू) सज्ज ठेवण्यात आले होते. येथे ऑक्सिजन, मॉनिटर, औषधी यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टरांची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती.

या आषाढी वारीमध्ये डॉक्टर, नर्स, आरोग्य सहाय्यक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाईगार अशा सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. पालखी मार्गावर ताप, सर्दी, खोकला, ड्रेसिंग, जुलाबचा त्रास झाल्यास सेवेसाठी दुचाकी रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात आली होती. आषाढी वारीमध्ये पालखी मार्गावर गर्दी जास्त असल्याने प्रत्येक ठिकाणी मोठी रुग्णवाहिका फिरू शकत नाही. त्यासाठी दुचाकी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

फिरत्या रुग्णवाहिकेबरोबरच १०२ व १०८ या रुग्णवाहिकाही पालखी मार्गावर सेवा देत होत्या. तसेच पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आले होते. रुग्णवाहिकेबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सोयही करण्यात आली होती.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पालखी मार्ग आणि पंढरपूर येथे पुरविण्यात आलेली सेवा

प्रत्येक ५ किमी अंतरावर ‘आपला दवाखाना’- २५८

वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका २४ बाय ७ उपलब्ध ७०७

दिंडी प्रमुखांसाठी औषधी कीट ५८८५

महिला वारकऱ्यांसाठी स्त्री रोग तज्ज्ञ १३६

पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हिरकणी कक्षाची स्थापना १३६ पालखी मार्गावर आरोग्य दूत २१२ पालखी सोबत माहिती, शिक्षण व संदेशवहन चित्ररथ ९ पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ खाटांची क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष ८७

आरोग्य शिक्षण संवाद आरोग्य ज्ञानेश्वरी उपक्रम.

# अखेर आजाराशी असलेली झुंज संपली

## पत्रकार सुधाकर सोनवणे यांचे निधन

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील तागडगाव येथील पत्रकार सुधाकर सोनवणे यांना काही दिवसापूर्वी कॅन्सर या आजाराने त्रस्त केले होते शेवटी त्यांची काल दि. १७ रोजी साडे अकराच्या सुमारास प्राणज्योत मावळली त्यांच्या निधनाने शिरूर कासार तालुका व जिल्ह्यात हळूहळू व्यक्त केली जात आहे .



सुधाकर सोनवणे यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये पत्रकारितेत गाव तालुक्यासह जिल्ह्यात आपली लौकिकता मिळवली होती जिल्ह्यातील अनेक वृत्तपत्रांमध्ये ते उपसंपादक म्हणून कार्यरत होते हाडामासाचा असलेला पत्रकार सर्वसामान्याच्या प्रश्नांसाठी धावून येत होता

त्यांची लेखणी जिल्ह्यातील अनेक अनेक प्रश्नांना वाचा फोडून गेली स्मितभासी व्यक्तिमत्व हसतमुख असलेला चेहरा काळाच्या पडद्याआड गेल्याने संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यात पत्रकारता , सामाजिक, राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे दि १८रोजी सकाळी १०च्या सुमारास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सोनवणे यांच्या दु:खात राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# आषाढी एकादशी निमित्त ज्योतीताई डक यांच्यावतीने फळांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

दि. १७ जुलै रोजी राज्यभर आषाढी एकादशी साजरी केली जात आहे. या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य ज्योतीताई नारायणराव डक यांच्यावतीने तालुक्यातील विविध ठिकाणी भाविकांना फळांचे वाटप करण्यात आले. ज्योतीताई डक यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक आणि स्वागत होत आहे.



आषाढी एकादशी ही सबंध महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस असतो. या दिवशी आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूर येथे जमा होतात. ज्यांना पंढरपूरला जाणे शक्य होत नाही असे सर्वजण आपल्या जवळच्या मंदिरात जाऊन पूजा अर्चा करीत विठ्ठलाकडे साकडे घालतात. या दिवशी सर्वजण भक्तिभावाने दिवसभराचा उपवास करतात. या निमित्ताने आपली सामाजिक जबाबदारी जपत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य ज्योतीताई नारायणराव डक यांनी मंगलनाथ मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, आणि केशवराज मंदिर, पुरुषोत्तम पुरी येथे जाऊन भाविकांसाठी फळांचे वाटप केले. यावेळी जमलेल्या शेकडो भाविकांनी ज्योतीताई डक यांनी दिलेल्या फळांचा आस्वाद घेत समाधान व्यक्त केले. दरम्यान, ज्योतीताई डक यांच्याकडून अशा पद्धतीचे नियमित सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यांनी राबविलेल्या आजच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राज्याच्या पर्यटन धोरणातून १८ लाख रोजगार निर्मिती होणार – पर्यटन मंत्री गिरीश महाजन

**मुंबई । प्रतिनिधी**

पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याचे पर्यटन धोरण – २०२४ तयार करण्यात आले आहे. पर्यटन धोरणाद्वारे राज्यात अंदाजे १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार निर्मिती करणार आहे. यामध्ये दहा वर्षात पर्यटनस्थळे तसेच पायाभूत सुविधा विकसित करुन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

मंत्री श्री.महाजन म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात त्यासाठी उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करुन ग्रामीण भागातील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील लघु, मध्यम, मोठे, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब, क, गटांमध्ये विभागण्यात आले असून त्यांना गुंतवणूक व रोजगार निर्मितीच्या आधारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना व्याज परतावा, एसजीएसटी परतावा, विद्युत शुल्कासह विविध करांमध्ये सवलतींचा धोरणात समावेश आहे. ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांसाठी होम स्टे, ॲग्रो टुरिझम या स्पर्धा विभागनिहाय राबविण्यात येणार आहेत. या धोरणामुळे राज्याचा देशातील राज्यांमध्ये अग्रेसर राज्य श्रेणीत समावेश होणार आहे.

देशातील व राज्यातील पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यायाने व्यापार- उत्पन्न आणि उद्योजकता यांना चालना देणे, पर्यटन क्षेत्रामध्ये ग्रामीण व शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटन क्षेत्रात नवीन गुंतवणूक आणणे,राज्याच्या महसुलात वाढ करणे, राज्यातील वैविध्यपूर्ण, बहुप्रांतीय, बहुभाषिक संस्कृती लक्षात घेता स्थानिक लोकसंस्कृतीवर आधारित कार्यक्रम आणि उत्सवाचा पर्यटनाच्या विकासासाठी उपयोग करुन घेणे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन नवकल्पना, उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविणे यावर या धोरणात भर देण्यात येणार आहे.एक खिडकी प्रणालीच्या संस्थात्मकीकरणासह खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी सक्षम वातावरण निर्माण करणे. केंद्र शासनाच्या मैत्री प्रणालीसह संलग्न केले जाणार आहे. पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत,सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज व अनुदान प्रोत्साहन, महिला उद्योजक, अनुसूचित जाती-जमाती, भिन्न सक्षम घटक यांना अतिरिक्त प्रोत्साहन,देश-परदेशातील पर्यटन प्रदर्शन,ट्रॅव्हल शो- मार्टमध्ये सहभागासाठी पर्यटन भागधारकांना प्रोत्साहन , ग्रामीण पर्यटन मेळावा,वार्षिक मेळावा आयोजनासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १५ लक्ष पर्यंत),मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क सूट, युवा पर्यटनासाठी प्रोत्साहन,पर्यटन पुरस्कार, कौशल्य विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन,पर्यटन/आदरातिथ्य उद्योगातील संशोधनासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत),माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान सक्षमीकरणासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत),दुर्मिळ कला,संस्कृती आणि पाककला पुनरुज्जीवित करण्यास प्रोत्साहन ( प्रति रु. ५ लाख पर्यंत),नाविन्यपूर्ण उत्पादने/सेवांसाठी प्रोत्साहन (प्रति रु, ५० हजार पर्यंत),दिव्यांगाना रोजगार देण्यासाठी प्रोत्साहन, पर्यावरण पर्यटन प्रमाणपत्रासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत),कृषी, कॅराव्हॅन, साहसी पर्यटनासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे, याबाबतचा सविस्तर शासन निर्णय राज्यशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असेही मंत्री श्री. महाजन यांनी म्हटले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त स्व.झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने कीर्तन महोत्सव आणि कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

मागील वीस वर्षांपासून सातत्याने राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात अध्यात्मिक चळवळ निर्माण करणाऱ्या स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दि. २१ जुलै ते २७ जुलै २०२४ या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री १० या वेळेत बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कीर्तन महोत्सव आणि कथा ज्ञान अमृत सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील भाविक भक्तांनी सहकुटुंब या कीर्तन श्रावणाचा आणि कथा ज्ञान यज्ञाचा लाभ घ्यावा असे आवाहन स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

### भाविकांनी सहकुटुंब यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घ्यावा

### स्व झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानचे आवाहन

स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने बीडमध्ये मागील वीस वर्षांपासून राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करत राज्यभरातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार यांच्यासह व्याख्याते आणि सुप्रसिद्ध वक्ते यांचे वैचारिक धन रसिक श्रोत्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य होत आहे. महाराष्ट्रासह देशभरातील ख्यातनाम, नामवंत मंडळींनी या कीर्तन महोत्सवाच्या व्यासपीठावर येऊन आपले विचार मांडलेले आहेत. तरुणांमध्ये विचारांचे गांभीर्य निर्माण करतानाच अध्यात्मिक विचारातून जीवन समृद्ध करण्यासाठी संत-महंतांचे विचार व त्यांचे जीवन कार्य कीर्तन आणि कथांच्या माध्यमातून या व्यासपीठावरून सर्व दूर पोहोचवण्याचे कार्य केले जात आहे. आषाढी एकादशी नुकतीच संपन्न झाले असून या निमित्त दि. २१ जुलै ते २७ जुलै या कालावधीत प्रतिष्ठानच्यावतीने शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये दररोज सकाळी १० ते रात्री १० या वेळेत सांप्रदायिक कीर्तन सेवा आणि दोन कथांच्या आयोजन करण्यात आले आहे या कालावधीमध्ये १२ नामवंत कीर्तनकारांची सांप्रदायिक कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. तसेच दोन कथा संपन्न होणार आहेत. या सर्व कार्यक्रमांचा बीडकर रसिक्रोत्यांनी सहकुटुंब उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# गाजापुर(विशाळगड)येथील मशिदीची, दर्गाची व मुस्लिम समाजाच्या घरांची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई करा..!

**पाटोदा । प्रतिनिधी**

विशाळगड (कोल्हापुर) च्या पायथ्याशी असणाऱ्या छोट्या, छोट्या वस्त्या व गाजापूर गावात गरीब मुस्लीम कुटूंबावर व धार्मिक स्थळावर जातीयवादी संघटनाच्या कार्यकर्त्यांनी जो भ्याड हल्ला केला आहे त्याचा निषेध करत समाजकंटकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी या साठी पाटोदा तालुक्यातील सकल मुस्लिम समाजाच्या वतीने आज दि.१९/०७/२०२४ शुक्रवार रोजी जुम्मा नमाज नंतर दुपारी २:०० वा पाटोदा तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे. या विषयी अधिक माहिती अशी की विशाळगड(कोल्हापुर)च्या पायथ्याशी असणाऱ्या छोट्या-छोट्या वस्त्या व गाजापूर गावात गरीब मुस्लीम कुटूंबावर व धार्मिक स्थळावर जातीयवादी संघटनाच्या कार्यकत्यांनी जो भ्याड हल्ला केला आहे त्याचा निषेध करत पाटोदा तालुक्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने दि. १९/०७/२०२४ शुक्रवार रोजी दुपारी २:०० वा पाटोदा तहसील कार्यालयावर निषेध मोर्चाचे आयोजन केले असुन सदर निषेध मोर्चा हजरत राज मोहम्मद सहाब दर्गा चौक (बाजारतळ) ते तहसील कार्यालय असा निघणार आहे. व खालील मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात येणार आहे. ०१) कायदे अंतर्गत हलेखोरांवर कडक कारवाई करण्यात यावी., ०२) संबंधित निष्क्रिय पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे., ०३) झालेल्या हल्ल्यामध्ये धार्मिक स्थळे व मुस्लिम समाजाचे घराची शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात यावी., ०४)हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या प्रत्येकी ०५ लाख रुपये सरकार तर्फे देण्यात यावे., ०५) मुस्लिम समाजासाठी संरक्षण कायदे तात्काळ विशेष अधिवेशन बोलावून तात्काळ पारित करण्यात यावे., ०६) महाराष्ट्रामध्ये विशेष करुन मुस्लीम समाजा सोबत असे प्रकार वाढतच आहे, सरकाने याची दखल घ्यावी. व तसेच या सर्व घटनेची सखोल चौकशी मार्फत करण्यात यावी. या मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात येणार आहे. या निषेध मोर्चा मध्ये पाटोदा तालुक्यातील मुस्लिम समाज बांधवांने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पाटोदा तालुका सकल मुस्लिम समाजातर्फे करण्यात आले आहे.

# केडरबेस कार्यकर्ता हा खोट्या व भ्रष्ट नेत्याला थारा देत नसतो- ॲड.आदमाने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केडरबेस कार्यकर्ता हा खोट्या व भ्रष्ट नेत्याला थारा देत नसतो. मात्र खऱ्या नेत्याला तो पुढे घेऊन जात असतो. केडर बेस कार्यकर्ता हा महापुरुषाच्या विचारधारेवर चालतो आणि त्या दिशेने राजकारणाची वाटचाल करत असतो तो सत्ताधाऱ्यांच्या अमिषाला बळी पडत नसतो. त्याची सत्तेची समीकरणे ही ध्येयवादी असतात कारण सत्ताही महापुरुषांच्या विचारधारेचा गंध असतो असे प्रतिपादन बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राज्य सचिव तथा विधिज्ञ माणिक आदमाने यांनी केले, ते अंबाजोगाई मध्ये आयोजित एक दिवशीय कार्यकर्ता शिबिरात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोलजी सावंत (प्राचार्य ,रेणुका डी एम एल टी महाविद्यालयात,अंबाजोगाई), उद्घाटक रोहिदास हातागळे (दूरदर्शन जिल्हा प्रतिनिधी बीड ) ,मार्गदर्शक ॲड. माणिक आदमाने ( प्रदेश सचिव बी आर एस पी, उपाध्यक्ष, वकील संघ अंबाजोगाई) यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थित होती.

पुढे बोलताना आदमाने म्हणाले की, जनतेचे कल्याण हाच सत्तेचा मूलमंत्र असला पाहिजे. परंतु आज राजकारण म्हटलं की लोक नाक मुरडायला लागलेले आहेत कारण एका रात्रीतून पक्ष बदलणारे नेते निर्माण झाले आहेत. त्यामुळे केडर बेस कार्यकर्ते हेच महापुरुषाची अभिप्रेत असणारी सत्ता आणू शकतात.

असे केडर शिबिर होणे काळाची गरज आहे, त्यामुळे दलबदलू नेता निर्माण होणार नाहीत व लोकशाही बळकट होईल असे उद्घाटक रोहिदास हातागळे यांनी नमूद केले. यावेळी अध्यक्षीय समारोप अमोल सावंत यांनी केले. यावेळी शिबिराचे प्रस्ताविक आकाश सोनवणे यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड वसंत हजारे यांनी केले. यावेळी शरद ओव्हाळ (जिल्हा अध्यक्ष बी आर एस पी), ॲड मा. निकाळजे , अमोल तरकसे, राजाभाऊ आदमाने, भारत मामा होके, अण्णासाहेब तरकसे, हर्षवर्धन तरकसे अभिजीत तरकसे, प्रकाश वाघमारे, विजय तरकसे, दशरथ तरकसे, विशाल जोगदंड, लक्ष्मण वाघे,अमोल आदमाने,अविनाश ओव्हाळ बाळासाहेब होके,अमोल चाटे,अमोल बनसोडे, नारायण होके, ऋषिकेश होके, आदित्य कांबळे भीमराज डुमने,सम्यक आदमाने , बळीराम तिडके , उमेश मुंडे आदी उपस्थित होते.

# नळकांडी पुलासाठी मंजुरी दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागरांनी मानले आभार

## अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील भानकवाडी येथे नळकांडी पुलासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या कामासाठी मंजुरी आणि निधी दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा परिषद आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.



बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील भानकवाडी ता.शिरूर-कासार येथील भानकवाडी ते साळुंकेवस्ती रस्त्याच्या दरम्यान रोंद नदी आहे. मात्र या नदीवर पूल नाही. त्यामुळे गावकऱ्यांना पाण्यातूनच ये-जा करावी लागते. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी भानकवाडी ते साळुंके वस्ती रस्त्यावर नळकांडी पुल होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत होते. प्रत्येक अधिवेशन, जिल्हा नियोजन समितीची प्रत्येक बैठक यांमध्ये हा महत्त्वाचा मुद्दा आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केलेला आहे. आता या महत्त्वाच्या असलेल्या कामास मंजुरी आणि निधी मिळाला आहे. त्यामुळे येथील शेतकरी आणि नागरिकांचा जीवनावश्यक असलेला प्रश्न मार्गी लागला असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा परिषद आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

दोन वर्षांपूर्वी झाला होता तीघांचा मृत्यू

दरम्यान याठिकाणी १० ऑक्टोबर २०२२ रोजी अत्यंत दुर्दैवी घटना घडली होती. याठिकाणी अतिवृष्टी झाल्याने आलेल्या पुरात दोन लहान मुली व एका तरूणाचा पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला होता. त्यामुळे याठिकाणी पूल होणे या भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांसाठी जीवनावश्यक झाले होते. अशा प्रकारची जीवीत हानी पुन्हा होऊ नये म्हणून आ.संदीप क्षीरसागर यांनी नळकांडी पुलाचा प्रश्न शासनदरबारी लावून धरला होता. भानकवाडी ते साळुंके वस्ती रस्त्यावर नळकांडी पूल बांधण्यात यावा, या मागणीसाठी आ.क्षीरसागर प्रत्येक अधिवेशन आणि प्रत्येक जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आक्रमक भूमिका घेत होते. परंतु शासनाकडूनही यावर उपाय न झाल्याने शेवटी आ.क्षीरसागर यांनी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती.

पान ६ वरून...

### बर्दापूरच्या वेअर हाऊस

लावत शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला आहे. या निकालावर हा सत्याचा व लोकशाहीचा विजय आहे अशी भावना शेतकरी ज्ञानेश्वर आबासाहेब देशमुख जवळगाव यांनी बोलून दाखवली असून न्यायालयाचे आभार मानले आहेत. या निकालाविरोधात बजाज यांनी तत्काळ उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मात्र, शेतकऱ्यांनी देखील कायदेशीर मार्गाने उच्च न्यायालयात लढण्याची तयारी केली असून वेळप्रसंगी सर्वोच्च न्यायालयात देखील लढा देण्याचा निर्धार केला आहे. हे प्रकरण न्यायालयात प्रभावीपणे मांडणारे ऍड. माधव जाधव यांचे देखील शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

### सद्गुरु वै. ह.भ.प सोपानकाका

कुंभार घाट पंढरपूर या ठिकाणी हा पुरस्कार देण्यात आला

ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांनी २० वर्ष मृदंग वादन सेवा केल्याने याची दखल घेत महाराजांना ह.भ.प. श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर यांच्या शुभ हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला तर या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. संतवीर बंडातात्या महाराज कराडकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर,ह.भ.प.बापूसाहेब महाराज देहूकर, द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर, ह.भ.प. श्री. चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प. कांचनताई जगताप ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे (इनामदार) यांची उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वागतोत्सुक ह.भ.प. श्री. गंगाधर कारभारी जाधव यांनी परिश्रम घेतले तर हा पुरस्कार मिळाल्याने ह. भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांचे माजलगाव व तालुक्यातील वारकरी, सांप्रदायिक मंडळींनी शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले.

cmyk

# देशातील पाच राज्यात दुधाला कायमस्वरुपी अनुदान

## अशी स्थिती महाराष्ट्रात कधी येणार ?



राज्य सरकारकडून गाय दुधाला प्रतिलिटर ५ रूपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान हे अनुदान ठराविक काळासाठीच असणार आहे. यामध्येही सरकारने अनेक नियम व अटी घातल्याने पात्र दूध उत्पादक शेतकऱ्यांनाच याचा लाभ मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारसारखे देशातील अनेक राज्यात गाय आणि म्हैस दुधाला अनुदान दिले जाते. यामध्ये कर्नाटक, गोवा, मध्यप्रदेश, राजस्थान आणि तेलंगणा राज्यात गाय आणि म्हैस दुधासाठी अनुदान दिले जाते. त्यानुसार महाराष्ट्र सरकारनेही सहकारी संघांच्या माध्यमातून संकलित केल्या जाणाऱ्या गाय व म्हैस दुधाला अनुदान देऊन प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

गोवा सरकारकडून दुग्ध व्यवसायाला चालना दिली जात आहे. दूध उत्पादकांना जास्तीतजास्त लाभ व्हावा किंवा त्यांनी त्यांच्या व्यवसाय अधिक क्षमतेने करावा, या हेतूने गेल्या दहा वर्षांपासून सहकारी तत्त्वावर सुरू असणाऱ्या संघ किंवा संस्थांच्या माध्यमातून संकलित होणाऱ्या गाय आणि म्हैस दुधासाठी ४० टक्के अनुदान दिले जाते.

फेडरल बॉडीच्या माध्यमातून थेट दूध उत्पादकांच्या बँक खात्यावर जमा करतात. गोव्यात एखाद्या उत्पादकाने एक हजार रुपयांचे दूध संस्थेला दिले, तर त्याच्या बदल्यात तेथील शासन ४०० रुपये देते. यामध्ये प्रतिलिटर सरासरी अकरा ते तेरा रुपये अनुदान दिले जात आहे. मात्र हे अनुदान देत असताना फॅट आणि एसएनएफ याचाही विचार केला जातो. गोवा राज्यात चांगली गुणवत्ता असणाऱ्या दुधालाच हा दर दिला जातो. गुणवत्ता आणि सहकार चांगला राहिला पाहिजे. यासाठीच ही योजना राबवली जात आहे. दरम्यान, गुणवत्तेशिवाय अनुदान दिले, तर उत्पादन चुकीच्या पद्धतीने वाढवले जाईल आणि त्यांचा फटका ग्राहकांना बसू शकतो, अशीही काळजी गोवा सरकारने घेतली आहे. राजस्थान सरकारकडून गाय आणि म्हैस दुधासाठी प्रतिलिटर पाच रुपयांचे अनुदान दिले जात आहे. गाय व मौस पशुपालक म्हणून महिला आघाडीवर असतात. त्यामुळे दुधाला पाच रुपये दर दिल्यामुळे महिला उद्योजकांनाच सशक्त करण्याची भूमिका राजस्थान सरकारने क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. फेब्रुवारी २०१९ पासून प्रतिलिटर दोन रुपये अनुदान दिले जात होते. त्यानंतर एक एप्रिल २०२२ पासून या प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. हे अनुदान थेट दूध उत्पादकांच्या बँक खात्यावर जमा केले जाते. राजस्थानमधील दूध उत्पादकांना वर्षाला ६०० कोटींहून अधिक रुपयांचा लाभ दिला जात आहे. कर्नाटक राज्यात गाय आणि म्हैस दुधासाठी सहा रुपयांचे अनुदान दिले जात आहे. कर्नाटकमध्ये प्रतिदिन एक कोटी लिटर दूध संकलन होते. कर्नाटका मिल्क फेडरेशनच्या (नंदिनी) माध्यमातूनच दूध संकलन होते. तसेच, अनुदानही थेट उत्पादकांच्या खात्यावर जमा केले जाते. ही योजना ठराविक काळासाठी नाही, तर निरंतरपणे सुरू आहे. तामिळनाडूत गाय आणि म्हैस दुधासाठी प्रतिलिटर तीन रुपये अनुदान आहे. आविन मध्यवर्ती संघ आहे, त्यांच्या माध्यमातून हे अनुदान दिले जाते. काही वेळेला या राज्यात दिले जाणारे अनुदान मागे-पुढे होते. मात्र, थोडा उशीर जरी झाला तरीही तामिळनाडू शासन संबंधित शेतकऱ्यांच्या नावावर ठरलेले अनुदान निश्चितपणे देत आहे. तेलंगणा राज्यातही गाय-म्हैस दूध वाढीला चालना देण्यासाठी सरकारकडूनच प्रोत्साहन दिले जात आहे. तरुणांनी दुग्ध व्यवसाय नेटाने आणि जोमाने करावा यासाठी तेलंगणा सरकार गाय म्हैस दुधासाठी प्रतिलिटर चार रुपये अनुदान देते.

सहकार मजबूत करण्याचे धोरण

कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, राजस्थान आणि उत्तरप्रदेश सरकारने दुग्ध व्यवसायला चालना देत सहकार भक्कम करत आहेत. जे दूध उत्पादक सहकारी संस्था आणि संघांना दूध पुरवठा करतात, त्यांच्याच दुधाला हे अनुदान दिले जात आहे. यासाठी ज्या-त्या राज्यातील मध्यवर्ती संघ चांगली भूमिका पार पाडत आहे. यामध्ये खासगी दूध संघांना अनुदान दिले जात नाही.

# 'कोळी कीडीचा' प्रादुर्भाव, नियंत्रण आणि उपाय



मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचाप्रादुर्भाव आढळून येत आहे. कोळी ही कीड अष्टपाद वर्गातील असून, आकाराने सूक्ष्म असते. साध्या डोळ्याने दिसणे कठीण जाते. पानांच्या शिराजवळ किंवा बरेचदा फळांच्या सालीवर बारीक खळग्यात ती अंडी घालते. प्रौढ लांबट, पिवळे असून, पिल्ले फिक्कट पिवळसर असतात. पिल्ले व प्रौढ कोळी आकाराचा फरक सोडल्यास सारखेच दिसतात. सध्या विदर्भातील काही जिल्ह्यात प्रामुख्याने रस्ट माईट व ग्रीन माईट या कोळी प्रजातींचा उद्रेक आढळून आला आहे. कोळीचा प्रादुर्भाव वर्षभर असला तरी फळ धारणेपासून ते फळ काढणीपर्यंत आणि ऑगस्ट ते ऑक्टोंबर दरम्यान जास्त असतो.

रस्ट माईट प्रादुर्भावाची लक्षणे : कीड, पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात व त्यातून येणारा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर आणि फळांवर करडे ठिपके आढळून येतात. प्रादुर्भाव वाढल्यास फळांवर तपकिरी लालसर रंगाचे चट्टे पडतात. या अवस्थेला शेतकरी 'लाल्या' म्हणून ओळखतात. या किडीमुळे फळांचे नुकसान होऊन अनियमित आकाराची फळे तयार होतात. प्रादुर्भावग्रस्त फळांचा रंग बदलतो व प्रत खालावते. त्यामुळे बाजारात कमी भाव मिळतो.

कोळी किडीचे व्यवस्थापन : प्रतिबंधात्मक उपाय - उन्हाळ्यामध्ये पाण्याचा ताण दिलेल्या झाडांना योग्य प्रमाणात पाणी मिळत आहे याची खात्री करून घ्यावी. पाण्याचा ताण पडल्यास कोळीचा प्रादुर्भाव वाढतो.

सेंद्रिय उपाय - अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा अझेंडीरॅक्टीन (५%) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड. नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) २% प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी. रासायनिक उपाय - कोळीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल (१८५ ई सी) २ मिली किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्ल्यू पी) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते.


# मक्याच्या दाण्यांपासून चारा निर्मिती



यंदा जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. आता पाऊस होत असला तरीही पावसाची तूट आहे. हिरवा चारा उपलब्ध होत असल्याने चाऱ्याचा प्रश्न काहीसा मिटला आहे. परंतु पावसाळ्यात दुभत्या जनावरांना हिरवा चारा चरण्यासाठी बाहेर नेता येत नाही. हिरव्या चाऱ्याला पर्याय म्हणून ग्रामीण भागातील काही पशुपालक मक्याचे दाणे भिजवून हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती करण्यास प्राधान्य देत आहेत.

कशी करायची चारा निर्मिती? : काही ठिकाणी तयार केलेल्या चारा पद्धतीनुसार, मक्याच्या दाण्यांना २४ तास भिजत ठेवा. २४ तासानंतर हे दाणे गोणपाटात काढून घेतल्यानंतर त्याला मोड येतात. यानंतर मोड आलेले मक्याचे दाणे घरात सात ते आठ मातीच्या मोठ्या टोपल्या आणि प्लास्टिक ट्रे यात माती टाकून पेरून ठेवा. एका ठिकाणी ४०० ग्रॅम मका पेरून त्याला दररोज दर दोन तासाने पाणी द्यावे, यातून एका आठवड्यात हा चारा वाढून पुढे १२ दिवसांत त्याची संपूर्ण वाढ होईल. एका ट्रेमध्ये साधारण सहा किलोपेक्षा अधिक चारा उपलब्ध होईल. वेळ, पाणी अन् जागेचीही बचत : या चाऱ्यामध्ये पौष्टिक प्रथिने, कर्बोदके, चवदार जीवनसत्त्व, सूक्ष्म अन्न घटकांचे प्रमाण भरपूर आहे. कमी पाणी लागत असल्यामुळे हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. यामुळे कमी जागेत कमी खर्चात सगळ्या प्रकारच्या हवामानात वर्षभर चारा उत्पादन करणे शक्य आहे. भरडलेल्या धान्यापेक्षा पौष्टिक : दुभत्या जनावरांना चारा म्हणून भरडलेले धान्य मोठ्या प्रमाणात दिले जाते. मात्र, पशुपालकांनी शोधलेल्या हायड्रोफोनिक चारानिर्मिती तंत्राच्या माध्यमातून केली जाते. हा चारा भरडलेल्या धान्यापेक्षा सुद्धा पौष्टिक आहे. शंभर टक्के सेंद्रिय, शेळ्यांनाही उपयोगी : चारा तयार करण्यासाठी कोणतेही रासायनिक खत किंवा औषध वापरले जात नसल्याने हा चारा १०० टक्के सेंद्रिय आहे. हा चारा शेळ्या आवडीने खात असून, यामुळे शेळीचे आरोग्य चांगले राहते.

# सातबारा उताऱ्यांचे डाऊनलोड १९ ते २२ जुलै दरम्यान राहणार बंद



पुणे : सातबारा उतारा याबद्दल एक महत्त्वाची बातमी आहे. भूमी अभिलेख विभागाचे ऑनलाइन पोर्टल तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत करण्यात येणार आहे. त्यामुळे १९ ते २२ जुलै दरम्यान विभागाची सर्व पोर्टल बंद राहणार आहेत. परिणामी तीन दिवसांच्या काळात सातबारा उतारा, मिळकत पत्रिका, फेरफार उतारे ऑनलाइन डाऊनलोड करता येणार नाहीत, अशी माहिती ई-फेरफार प्रकल्पाच्या राज्य समन्वयक सरिता नरके यांनी दिली.

ई-फेरफार, ई-हक्क, ई-चावडी तसेच ई-महाभूमी या पोर्टलवरून सातबारा उतारे, आठ अ, मिळकत पत्रिका, फेरफार उतारे ऑनलाइन डाऊनलोड करता येतात. या पोर्टलचे सॉफ्टवेअर जुने झाल्याने सध्या वेगाची मर्यादा येत आहे. उतारे डाऊनलोड करताना अडचणी येतात. हे सॉफ्टवेअर २०१६ पासून वापरात आहे. त्यात आधुनिकता आणणे गरजेचे होते. त्यामुळेच भूमी अभिलेखने हे सॉफ्टवेअर अद्ययावत करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी विभागाकडून चालविण्यात येणारी सर्व पोर्टल १९ जुलैच्या सायंकाळी ६ वाजेपासून २२ जुलैच्या रात्री १२ पर्यंत बंद राहतील.

कमी वेळात उतारे होणार डाऊनलोड : नवीन सॉफ्टवेअर हे २०२४ मध्येच तयार करण्यात आले आहे. त्याची चाचणी यशस्वी झाली असून, त्याचा वापर सुरू झाल्यानंतर उतारे कमी वेळेत डाऊनलोड होतील, अशी माहितीही नरके यांनी यावेळी दिली. सध्या ई-पीक पाहणी, खरीप पीक विमा योजना तसेच अन्य योजनांसाठी शेतकरी अर्ज करत आहेत. त्यामुळे अर्ज भरण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे त्यांनी १९ जुलैपूर्वीच काढावीत, जेणेकरून अर्ज करताना अडचण येणार नाही, असेही नरके यांनी सांगितले.




### महत्वाच्या घटना

१६९२ : अमेरिकेतील सेलम शहरात चेटकीण असल्याच्या आरोपाखाली स्त्रियांना फाशी देण्यात आली.
१८३२ : सर चार्ल्स हेस्टिंग्स यांनी ब्रिटिश मेडिकल असोसिएशन आणि सर्जिकल असोसिएशनची स्थापना केली.
१९०० : पॅरिस मेट्रोची पहिली सेवा सुरु झाली
१९०३ : मॉरिस गरीन यांनी पहिली टूर डी फ्रान्स स्पर्धा जिंकली.
१९०५ : लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणीची घोषणा केली.
१९३५ : जगात 'पार्किंग मीटर'चा वापर प्रथमच अमेरिकेतील ओक्लाहोमा शहरातील वाहनतळावर सुरू झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध केप स्पादाची लढाई
१९४७ : म्यानमारच्या सरकारचे नियोजित पंतप्रधान आंग सान व त्यांच्या ६ मंत्री आणि २ सहकार्यांची गॅलॉन सॉ याने हत्या केली.
१९५२ : फिनलंडमधील हेलसिंकी येथे १५ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९६९ : भारतातील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९६९ : नील आर्मस्ट्राँग, एडवीन ऑल्ड्रिन व मायकेल कॉलिन्स या अंतराळवीरांसह अपोलो ११ हे अंतराळयान चंद्राच्या कक्षेत पोहोचले.
१९७६ : नेपाळमधे सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाची रचना करण्यात आली.
१९८० : सोविएत युनियनमधील मॉस्को येथे २२ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९२ : ऊर्दू कवी मजरुह सुलतानपुरी यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे इक्बाल सन्मान पुरस्कार जाहीर
१९९३ : ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल डॉ. बानू कोयाजी यांना समाजसेवेसाठीचा 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
१९९६ : अमेरिकेतील अटलांटा येथे २६ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
२००५ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी अमेरिकेच्या काँग्रेसला संबोधित केलं.
२००८ : प्रशांत महासागरात आपल लक्ष्य निर्धारित करून अमेरिकेने लांब पल्ल्या मारण्यास सक्षम असलेल्या एका क्षेपणास्त्राची चाचणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : अमेरिकन संशोधक सॅम्युअल कॉल्ट यांचा जन्म.
१८२७ : मंगल पांडे क्रांतिकारक (मृत्यू: ८ एप्रिल १८५७)
१८३४ : फ्रेंच चित्रकार एदगार देगास यांचा जन्म.
१८९६ : ए. जे. क्रोनिन स्कॉटिश लेखक (मृत्यू: ६ जानेवारी १९८१)
१८९९ : भारतीय डॉक्टर, लेखक, कवी आणि नाटककार बालाइ चांद मुखोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९८९)
१९०२ : यशवंत नरसिंह केळकर कवी, कोशकार, इतिहास संशोधक, इतिहास लेखक, शाहिरी वाङ्मयाचे संग्राहक, संपादक व प्रकाशक (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९९४)
१९०२ : भारतीय गायक, निर्माता, निर्माता आणि पटकथालेखक समृतरा राघवाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १६ मार्च १९६८)
१९०९ : भारतीय कवी आणि लेखक बाल्मनी अम्मा यांचा जन्म. (मृत्यू: २९ सप्टेंबर २००४)
१९२७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सैनिक मंगल पांडे यांचा जन्मदिन.
१९३८ : सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ आणि गणितज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचा कोल्हापूर येथे जन्म.
१९४६ : इलि नास्तासे रोमानियन टेनिसपटू १९६४ मधे केम्ब्रिज विद्यापीठात डॉ. फ्रेड हॉईल यांच्याबरोबर संशोधन करुन गुरुत्वाकर्षणासंदर्भातील एक नवा सिद्धांत मांडला.
१९५५ : रॉजर बिन्नी क्रिकेटपटू
१९६१ : भारतीय पत्रकार आणि लेखक हर्षा भोगले यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

९३१ : उडा जपानचा सम्राट (जन्म: ५ मे ८६७)
१३०९ : संत विसोबा खेचर (संत नामदेव यांचे गुरू) समाधिस्थ झाले (जन्म:)
१८८२ : फ्रान्सिस बाल्फोर प्राण्यांच्या वर्गीकरणाविषयी मूलभूत संशोधन करणारे ब्रिटीश निसर्ग शास्त्रज्ञ (जन्म: १० नोव्हेंबर १८५१)
१९६५ : सिंगमन र्‍ही दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २६ मार्च १८७५)
१९६८ : प्रतापसिंग गायकवाड बडोद्याचे महाराज (जन्म: २९ जून १९०८)
१९८० : तुर्कस्तानचे पंतप्रधान निहात एरिम यांचे निधन.
२००४ : जपानचे पंतप्रधान झेन्को सुझुकी यांचे निधन.

# शेतकऱ्याचा कोलंबस नारळ शेतीचा यशस्वी प्रयोग!



काही शेतकरी सध्या त्यांच्या भागात घेतले जाणारे विशिष्ट पीक वगळून काही नवीन पीक घेण्याचा प्रयोग करत आहेत. असाच एक यशस्वी प्रयोग केला आहे नाशिक जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांने. कसमादे परिसरात डाळिंब पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र डाळिंबावर तेल्या व मर रोग आल्याने अनेक शेतकरी डाळिंब पीक सोडून वेगवेगळ्या पिकांची शाश्वत शेती करताना दिसत आहेत. बहुसंख्य शेतकऱ्यांचा फळशेती करण्याकडे कल आहे. शेतकरी पेरू, चिकू, आंबा, द्राक्ष, ड्रॅगन फ्रूट, ॲपल बोर, अंजीर, उन्हाळ्यात टरबूज, खरबूज, काकडी, केळी लागवड करताना दिसत आहेत. यात ब्राह्मणगावचे शेतकरी दीपक अहिरे यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत येथे कोलंबस नारळाची लागवड केली आहे.

दीपक अहिरे यांनी बागेत नारळाबरोबर लिंबू व पेरुची लागवड केली आहे.

त्यांनी प्रथमच हा प्रयोग केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांसाठी हे फायदेशीर ठरणार आहे. मालेगावचे उपविभागीय कृषी अधिकारी गोकुळ अहिरे यांनी डाळिंब पीक घेताना कुठलाही एकच बहार घेण्याचे सांगितले त्यामुळे तेल्या व मर रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो.

नारळ शेतीचे व्यवस्थापन : फळपिकांना खर्च कमी, तसेच उत्पन्न जादा असल्याने बहुतेक शेतकरी या पिकांची लागवड करीत आहेत. दीपक अहिरे यांनी गेल्या वर्षापासून नारळाची झाडे लावली आहेत. येथे चार एकरात पाचशे नारळांची झाडे लावण्यात आली आहेत. यात लहान जातीच्या कोलंबस नारळाची त्यांनी लागवड केली आहे. या नारळाची वैशिष्ट्ये म्हणजे याला तीन फुटांपासून नारळ येतात. रोप पाच वर्षांचे झाल्यानंतर त्याला नारळ येण्यास सुरुवात होते. एका झाडाला सुमारे पाचशे ते सातशे नारळे लागतात. अहिरे यांनी आंध्र प्रदेश राज्यातील राजमंडरी येथून थेट तीनशे रुपये नगाप्रमाणे नारळाची रोपे आणली. १८ बाय १८ फुटावर नारळाची त्यांनी लागवड केली आहे. दीपक अहिरे हे नारळ ओल्या शहाळ्यासाठी वापरणार आहेत. बरेचदा एकच पीक त्या त्या भागात घेतल्याने किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढू शकतो त्यामुळे हे टाळण्यासाठी पीक फेरपालट किंवा वेगळ्या पिकांचा प्रयोग करणे लाभदायक ठरत असते. दीपक अहिरे यांनी केलेला हा नवीन प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी सुद्धा प्रेरणादायी आहे.

# बंद केलेली जिल्हा परिषद शाळा तात्काळ सुरु करा : माजेद अहमद

## सीईओने दिले कारवाईचे आदेश



बीड । प्रतिनिधी

शहरातील असलेल्या शिवाजीनगर जिल्हा परिषद उर्दू शाळा शिक्षकांनीच मनमानी कारभार करून विना परवानगी अनधिकृतपणे बंद करून डेप्युटेशन करून दुसऱ्या जवळची शाळा गाठल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मात्र शिक्षण विभाग याकडे दुर्लक्ष करून झोपले आहे शिक्षण विभागाचे कोणतेही नियंत्रण राहिले नाही असे या प्रकरणातून दिसून येते. शाळा तात्काळ पुन्हा सुरू करून याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद व सचिव शेख इरशान यांनी डेप्युटी सीईओ प्रदीप काकडे यांना निवेदन देऊन केली आहे तसेच याप्रकरणी सीईओ यांनी विभाग प्रमुखला तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहे.

एकीकडे उच्च शिक्षित हजारो बेरोजगार तरुण नौकरीसाठी धावपळ करूनही त्यांना सरकारी नौकरी मिळत नाही तर दुसरीकडे असे धक्कादायक प्रकार शहरात दिसून येत आहे. तालुक्यातील अजिजपुरा केंद्र अंतर्गत असलेली जि. प. शिवाजीनगर उर्दू शाळा १ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून शाळेत ४ पदे मंजूर पैकी दोन २ सह शिक्षक व १ प्रा.प. असे ३ शिक्षक कार्यरत आहे. १५ जून शनिवारी पासून शाळा सुरू झाल्या आणि कमी पटसंख्या व मुले येत नाही असे कारण सांगून २१ जून रोजी शाळा ताबडतोब बंद करण्यात आली. वास्तविक पाहता शाळा सुरु झाल्यावर रविवारी सुट्टी आली नंतर मुस्लिम समाजाची बकरी ईद सणाच्या निमित्ताने विद्यार्थी शाळेत आले नाही म्हणून सर्व नियम डालवून, कोणाचीही परवानगी न घेता परस्पर अनधिकृतपणे शाळा बंद केले व कार्यरत तिन्ही शिक्षकांना केंद्रप्रमुख व मुअ यांनी अधिकार नसतानाही अनधिकृतपणे तात्पुरती व्यवस्था म्हणून लेखी आदेश देऊन इतर जवळच्या शाळेत प्रतिनियुक्ती केली. वास्तविक पाहत ताबडतोब दाखले देऊन पटसंख्या कमी करून शाळाच बंद करण्यात आली आहे. सदरील अनधिकृतपणे बंद केलेली शाळा तात्काळ सुरू करावे व प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. शाळा कायम ठेवण्यासाठी इतर इच्छुक शिक्षकांची तात्काळ याठिकाणी नियुक्ती करावी अशी मागणी संघटने द्वारे करण्यात आली आहे. तसेच कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

# जय जवान विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती



वडवणी । प्रतिनिधी

जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बू. ता. वडवणी जिल्हा. बीड विद्यालयात दि १८/०७/२०२४ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या पावन प्रतिमेचे पूजन व पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमा साठी विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य सारोक्ते डि. जी यांच्या हस्ते पुष्प हार अर्पण करून अभिवादन केले. त्याच बरोबर या कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याबद्दल, व त्यांच्या साहित्य रचना, आणि त्यांच्या महान कर्याबद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली व त्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद घाडगे, टाले, हांगे, यादव, मुंडे, येवले, चोपडे, तौर, गोंदरे जी एम आदी सर्व उपस्थित होते.तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी,विद्यार्थिनी , पालक वर्ग , शिक्षण प्रेमी, तरूण मित्रमंडळ व माजी विद्यार्थी आदी सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात




### तुलसी कॉलेज येथे अण्णाभाऊंना अभिवादन

बीड : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दिनांक १८ जुलै रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तुलसी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डी.जी निकाळजे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील प्राध्यापक,कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

धारूर : शहरात सामाजिक कार्यकर्ते कै. गजानन डूबे यांच्या पुण्यतिथी निमित्त धारूर शहरांमध्ये दिनांक २१/०७/२०२४ रोजी नगरेश्वर मंगल कार्यालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिराचा तालुक्यातील गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कै. गजानन डूबे सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. शहरातील सामाजिक कार्यकर्ते कै. गजानन डूबे सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून शहरांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात विद्यार्थ्यांना बिनव्याजी शैक्षणिक कर्ज, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप यासह मोफत शस्त्रक्रिया शिबिर आयोजन केले आहे. यांच्या पुण्यतिथीनिमित्त लॉयन्स नेत्र रुग्णालय नांदेड व कैलासवासी गजानन डूबे सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील गरजू नागरिकांसाठी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले आहे या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे. या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी सपना कलेक्शन, आदित्य ज्वेलर्स व व्यंकटेश मोबाईल शॉपी यांच्याकडे नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.



# ओबीसीत रामराज्य आणण्यासाठी रामसेठ राठोड विधिमंडळात पोहोचणार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले असून राज्य, रा तहष्ट्रीय पक्षासह वेगवेगळ्या समाजाच्या समूहातून सुद्धा अनेक जण तयारी करत असल्याचे चित्र दिसून येत असतानाच बंजारा समाजातून येणाऱ्या उद्योजक रामशेठ राठोड यांनीच ओबीसी समाजातून विधानसभा निवडणूक लढवावी असा सूर आवळला जात आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजात रामच रामराज्य आणण्यासाठी विधिमंडळात जावेत अशी अपेक्षा मतदार व्यक्त करत आहे.

रामसेठ राठोड हे माजलगाव तालुक्यातील बहुचर्तीत असलेल्या मोगरा येथील सामान्य कुटुबातील असून गेली अनेक वर्षापासून राजकीय, सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. साधारण परिस्थितीशी दोन हात करून मुंबई या मायानगरीत उत्कृष्ट उद्योजक म्हणून नाव कमावलेले आहे. तसेच त्यांना विविध पुरस्कारानेही सन्मानित केलेले आहे. नायक प्रतिष्ठान निर्मिती करून त्या माध्यमातून हजारो व्यसनमुक्त युवकांची फळी निर्माण करण्यात त्यांनी यश मिळवलेले आहे. येत्या काळात मतदार संघातील बेरोजगार असलेल्या १००० तरुणांना उद्योजक बनवण्याचा त्यांनी विडा उचलला त्यामुळे अनेकाच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य लाभणार आहे. अशा रामशेठ राठोड यांच्यासारख्या कुशल नेतृत्वाची मतदार संघाला गरज आहे. माजलगाव मतदार संघात बंजारा, वंजारा, धनगर, मुस्लिम, दलित, गरजवंत मराठा व इतर लहान मोठ्या जाती एकत्र येऊन रामशेठ राठोड यांना विधिमंडळात पाठवण्याचा निर्णय ओबीसी समुदायाने घेतला असून राठोड यांनीच निवडणूक लढवावी अशी मागणी मतदार वर्ग करत आहे.



बीड : साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ग्रुप बीडच्या वतीने अभिवादन करण्यात आले त्यावेळी जेष्ठ मार्गदर्शक सचिन आप्पा सोनवणे, प्रशांत वासनिक, अनिल निसर्गध, जयंती समितीचे अध्यक्ष अजय सरवदे, हनुमान क्षीरसागर, दीपक कांबळे, नितीन मुजुमुले, पंकज चांदणे, मिलिंद सरपते,प्रवीण जगताप आदी उपस्थित होते.

# माजलगाव विधानसभेची जागा काँग्रेसला सोडा -होके पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बीड जिल्हा आढावा बैठकीत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा रितसर आढावा देण्यात आला व यावेळेस महाविकास आघाडीतील माजलगाव विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाला सोडून मतदारसंघांत पक्ष संघटना वाढीसाठी बळ द्यावे अशी मागणी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पक्ष नेतृत्वाला केली.

यावेळी ते म्हणाले महाराष्ट्रामध्ये २००४ पासून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आघाडी आहे परंतु आजपर्यंत आघाडी मध्ये माजलगाव विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाला सोडण्यात आलेली नाही तसेच सर्व धर्म समभाव मानणारा काँग्रेस हा एकमेव पक्ष असल्यामुळे सद्य स्थितीत या मतदारसंघात काँग्रेस पक्षासाठी अनुकूल वातावरण असुन पक्षाला मानणारा मोठा मतदारही या मतदारसंघात आहे त्यामुळे महाविकास आघाडीतील माजलगाव विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाला सोडून घेऊन कार्यकर्त्यांना न्याय द्यावा अशी मागणी मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केली तसेच सर्वांच्या उपस्थितीत तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांनी पक्षाचा इच्छुक उमेदवारीचा फॉर्म भरून माजी मंत्री अशोक पाटील, प्रदेश प्रतीनिधी अनिलराव मुंढे जिल्हा अध्यक्ष राजेसाहेब देशमुख, उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या कडे सुपूर्द केला. यावेळी दादासाहेब मुंढे महाविर मस्के दत्ता कांबळे,धारूर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सिध्देश्वर रंदवे वडवणी तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे अवेज कुरेशी पांडुरंग मस्के बाबुराव झोडगे सुब्बाराव सोळंके प्रभाकर चव्हाण शेख.आहेमंद समियोद्दीन अंसारी अंनत घडसिंगे यांच्या सह मतदारसंघातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री योगेश्वरी देवल कमिटी विश्वस्त मंडळाच्या वतीने आयोजित अन्नछत्र



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहराची ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी देवीच्या मंदिरात नुकत्याच स्थापन झालेल्या विश्वस्त मंडळाच्या वतीने येणाऱ्या भाविकांसाठी अन्नछत्राची सुरुवात गुरुवार दि १८ रोजी करण्यात आली. या अन्नछत्राचे उदघाटन माता योगेश्वरी देवीचे भक्त जेष्ठ नागरिक पंडितराव शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी डॉ गोपाळराव चौसळकर, देवल कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह कोशाध्यक्ष शिरीष पांडे, छाया कोदरकर, गौरी देशपांडे, उषा सेलमूकर, प्रवीण दामा, अमोल लोमटे, रवी कदम, सुनील अप्पा शेट्टी, यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

अंबाजोगाई शहराची ओळख असलेल्या माता योगेश्वरी मंदिराच्या देवल कमिटीचे विश्वस्त मंडळ नुकतेच स्थापन झाले आहे. हे विश्वस्त मंडळ पदसिद्ध अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे यांच्या अध्यक्षतेखाली नवनविन उपक्रम हाती घेत आहे. उपाध्यक्ष राजकिशोर मोदी व अन्य सभासदांच्या सहकार्याने देवल कमिटी योगेश्वरी मंदिर तसेच येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी विशेष प्रयत्न करतांना दिसून येत आहे. याचाच भाग म्हणून आज मंडळाच्या वतीने अन्नछत्राची सुरुवात करण्यात आली. दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत हा महाप्रसाद योगेश्वरी देवल कमिटीच्या वतीने येणाऱ्या सर्व भाविकांना याचा लाभ मिळणार आहे.या अन्नछत्राद्वारे येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची मोठया प्रमाणावर सोय होणार आहे. उपस्थित भाविकांनी देखील या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले आहे. अन्नछत्र सुरू झाल्यानंतर जवळपास ४०० च्या वर भाविकांनी देवीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसाद घेऊन भाविक समाधान व्यक्त करतांना दिसून येत होते. याप्रसंगी दररोज दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांनी देवल कमिटीच्या वतीने देण्यात येत असलेल्या महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले. या कार्यक्रमाला किसनराव भोसले, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, अरुण काळे, अर्जुन वाघमारे, विलास काळम, महेश कदम भरत बलुतकर आणि बागेश बलुतकर यांच्यासह अनेक देवीभक्तांची उपस्थिती होती.

# सोपानकाका महाराज देहूकर वारकरी पुरस्कार सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

ह.भ.प.आचार्य रामकृष्ण महाराज लहवितकर ट्रस्ट व देहूकर महाराज फड यांच्याद्वारे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील अतिशय गौरवशाली व सेवाभावी व्यक्तीचा वै.सद्गुरु सोपानकाका महाराज देहूकर यांच्या पुण्यस्मरणार्थ वारकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी २०२४ चा सद्गुरु वै.सोपानकाका महाराज देहूकर सांप्रदायिक मृदंग वादक सेवा पुरस्कार माजलगावचे भूषण व गेल्या अनेक वर्षापासून ज्यांना संपूर्ण महाराष्ट्रात कीर्तनकार म्हणून ओळखले जाते असे आदिनाथ महाराज फपाळ यांना दिनांक १८ जुलै रोजी श्री देहूकर वाडा कुंभार



घाट पंढरपूर या ठिकाणी हा पुरस्कार देण्यात आला.

आदिनाथ महाराज फपाळ यांनी २० वर्ष मृदंग वादन सेवा केल्याने याची दखल घेत महाराजांना ह.भ.प. श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर यांच्या शुभ हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला तर या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी संतवीर बंडातात्या महाराज कराडकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून. गहिनीनाथ महाराज औसेकर, बापूसाहेब महाराज देहूकर, द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर, चैतन्य महाराज देगलूरकर, कांचन जगताप पुरुषोत्तम महाराज मोरे (इनामदार) यांची उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वागतोत्सुक ह.भ.प. श्री. गंगाधर कारभारी जाधव यांनी परिश्रम घेतले तर हा पुरस्कार मिळाल्याने ह. भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांचे माजलगाव व तालुक्यातील वारकरी, सांप्रदायिक मंडळींनी शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले.

# खरीप हंगाम वर्ष २०२४ पीक स्पर्धेसाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या पिक उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरात इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत विकास स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. राज्यात खरीप हंगाम सन २०२४ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफुल या ११ पिकांसाठी पिकस्पर्धा आयोजन करण्यात आली आहे. पिकस्पर्धेसाठी तालुका हा घटक आधारभूत धरण्यात येतो. शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील बक्षीस देण्यात येतात. १. राज्यस्तरीय प्रथम क्रमांक बक्षीस रक्कम रुपये ५००००/- २.राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक बक्षीस रक्कम रुपये ४००००/- ३.राज्यस्तरीय तृतीय क्रमांक बक्षीस रक्कम रुपये ३००००/- खरीप हंगाम सन २०२४ स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु. ३०० व आदिवासी गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रुपये १५०, प्रवेश शुल्क भरून पीक स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल. स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख मूग व उडीत पिकासाठी ३१ जुलै २०२४ व भात, ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२४ अशी अंतिम दिनांक आहे.

## जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए.बी.जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २१३/२०२४**

**अहिल्याबाई व इतर २ वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत बापुराव पिता नामदेव सरकटे मौजे धारूर ता. धारुर जि.बीड हे दिनांक २०/०३/२०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे.त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ आहिल्याबाई भ्र. बापुराव सरकटे, वय ५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. जाधवगल्ली कसबा विभाग ता. धारुर जि. बीड, अर्जदार क्र. २. सखाराम पिता बापुराव सरकटे, वय ४३ वर्षे, धंदा शेती रा. सदर, अर्जदार क्र. ३. राजाभाउ पिता बापुराव सरकटे, वय ४० वर्षे, धंदा शेती रा. सदर यांनी अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आणि अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार ही मयत बापुराव पिता नामदेव सरकटे यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत बापुराव पिता नामदेव सरकटे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज **दिनांक : ११/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.पुढील तारीख : २०/०८/२०२४**

आदेशावरून स्वाक्षरित

स्वाक्षरित सी. के. पवार क. लिपिक — शिक्का — **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर

## जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए. बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९७/२०२४**

**स्वाती व इतर ३ वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत अविनाश पिता अंबादास राउत मौजे कुरुंद गल्ली धारुर ता.धारुर जि.बीड हे दिनांक १३/०५/२०२४ रोजी धारुर ता. धारुर जि. बीड येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १. स्वाती भ्र. अविनाश राउत वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा. कुरुंद गल्ली धारुर ता. धारुर जि.बीड अर्जदार क्र. २. सात्विक पिता अविनाश राउत वय १२ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. अर्जदार क्र. १ रा. सदर, अर्जदार क्र. ३. सार्थक पिता अविनाश राउत वय १४ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. अर्जदार क्र. १ रा. सदर, अर्जदार क्र. ४. गिरीजाबाई भ्र. अंबादास राउत, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर यांनी अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले आणि अर्जदार क्र. ४ ही मयताची आई या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत अविनाश पिता अंबादास राउत यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत अविनाश पिता अंबादास राउत यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.**आज दिनांक ०५/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

**पुढील तारीख : १४/०८/२०२४**

आदेशावरून स्वाक्षरित

स्वाक्षरित सी. के. पवार क. लिपिक — शिक्का — **सहा.अधिक्षक** दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९९४/२०२४ ॲड. जाधव सी. बी.**

अर्जदार : १) गयाबाई किसन वाघमारे, वय- ७८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. अंधापुरी घाट ता. जि. बीड २) दत्तात्रय किसन वाघमारे, वय- ४६ वर्षे, धंदा-शेती व मजुरी, रा. अंधापुरी घाट ता. जि.बीड ३) शहाजी किसन वाघमारे, वय- ३८ वर्षे, धंदा-शेती व मजुरी, रा. अंधापुरी घाट ता.जि.बीड ४) रंजना बाबु काळे, वय- ६४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. तांदळवाडी ता. जि.बीड

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक अर्जदार हे भारतीय आहेत, प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे किसन पि. लक्ष्मण वाघमारे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे किसन पि. लक्ष्मण वाघमारे, रा. अंधापुरी घाट, ता. जि. बीड हे दिनांक २५/१२/२०१२ रोजी मौज अंधापुरी घाट, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत अर्जदार क्र.४ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार यांच्यशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मंयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक १२/०८/२०२४**

**आज दिनांक १२/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

आदेशावरून स्वाक्षरित

स्वाक्षरित क लिपीक — शिक्का — **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# गटविकास अधिकारी सुधारले तरच रोजगार हमी योजना सुधारेल

## जिल्हाधिकाऱ्यांनी आणखी लक्ष द्यावे –ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रोजगार हमी योजना वरील नियंत्रण पूर्णपणे ढासळले आहे. भ्रष्ट कामाशिवाय पण हलत नाही. या कामाची सुरुवात गटविकास अधिकारी यांचे पासून होते. त्यामुळे जोपर्यंत गटविकास अधिकारी सुधारत नाहीत, तोपर्यंत ही रोजगार हमी योजनेचा खरा लाभ शेतकऱ्यांना मिळणार नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याचे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

करोडो रुपये खर्च करून शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी ही योजना चालू आहे. मुजरांना देखील मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. रोजगाराची हमी आणि वैयक्तिक लाभ, असे दुहेरी तत्व यात आले आहे. त्यामुळे ही योजना सर्वांगीण विकासाची योजना आहे. सन १९७२ च्या दुष्काळात रस्त्यावर खडी फोडली जात होती. खऱ्या अर्थाने तेव्हापासून रोजगार हमी योजना आली आहे. मात्र डोळे झाक करणाऱ्या काही गट विकास अधिकाऱ्यांना आता खडी फोडायला पाठवले पाहिजे, अशी वेळ



आली आहे. त्याशिवाय कायद्याचे तंतोतंत पालन होणार नाही. प्रशासनावर आमचा राग आहे, अशातली बाब नाही. पण समोर दिसत असताना गप्प बसणार आणि घोटाळे दाखविल्यानंतरही गप्प बसणार, हे दुर्दैव आहे. लाख लाख रुपये पगार घेऊन जर तुम्ही झोपा काढणार असाल ? तर त्यापेक्षा काम बंद केलेले बरे. या सर्व प्रकाराकडे पाहिले तर आता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना प्रत्येक कामाचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात देण्याचे आदेश द्यावेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या सोबतच्या आमच्या बैठकीनंतर गेवराई तालुक्याला हे आदेश दिलेले आहेत. मात्र हे आदेश आता जिल्हाभरातल्या गटविकास अधिकाऱ्यांना देणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय तातडीने घ्यावा, असे आवाहन देखील ॲड. देशमुख यांनी केले आहे.

# आष्टीतील मुर्शदपुर भागामध्ये पिसाळलेल्या कुत्र्याने घेतला १५ जणांना चावा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी मुर्शदपुर परिसरामध्ये एक काळसर रंगाचा अंगावर पांढरे पट्टे असलेला एक कुत्रा पिसाळला असून त्याने सुमारे १५ जणांना चावा घेतला असल्यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण पसरलेले आहे नागरिकांनी आपापली लहान मुले यांची काळजी घ्यावी असे आवाहन सरपंच शालनबाई अशोक मुळे यांनी केले आहे आषाढी एकादशी दिवशी दि.१७ रोजी या कुत्र्याने परिसरातील १५ जणांना चावा घेतला आहे

विशेष म्हणजे हेच चावे मोठ्या प्रमाणावर घेतले असल्यामुळे ३ रुग्णांना अहमदनगर येथील नागरी रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागले

आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये अँटी रेबीज व्हॅक्सिन उपलब्ध आहे परंतु मोठ्या प्रमाणावर जावा घेऊन झालेल्या जखमा असतील तर त्यांना सिरम कंपनीच्या इंजेक्शनची आवश्यकता असते अशी इंजेक्शन आष्टी येथे उपलब्ध नाहीत ते उपलब्ध व्हावेत यासाठी प्रयत्न करण्याचे आपण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक आणि वैद्यकीय अधिकारी यांना सांगितले असून मुर्शदपुर



## परिसरात घबराटीचे वातावरण

ग्रामपंचायत चे कर्मचाऱ्यांनी दिवसभर या पिसाट कुत्र्याचा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही तरी आम्ही शोधात आहोत असे सांगत मुर्शदपुर परिसरामध्ये राहणाऱ्या नागरिकांनी आपल्या घरातील लहान लहान मुलांना घराबाहेर फिरू देऊ नये त्यांची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.



**पिंपळवंडी : पी.एम.पवार सर यांची नात शितल विजय पवार व अभिजीत भरत तिकटे शुभमंगलप्रसंगी मा.आ.सुनील धांडे,राष्ट्रवादी युवा नेते वरूण पाथ्रीकर,उद्योजक आप्पासाहेब सप्रे, न्यायाधिश संतोष पवार,शिवनाथ पवार,इंजि.सुंदरराव पवार,भास्करराव पवार,भैय्या लांडगे,मा.सरपंच मनिषा पवार,दत्ता खोटे,संदीप पवार,अशोक पवार,एस.के.पवार,एस.आर.पवार सर,बाळासाहेब पवार व मित्र परिवार आप्तेष्टनी वधू वरास शुभ आशीर्वाद दिले.**

## रामभाऊ सुरवसे यांचे निधन

**बीड। प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी नाका जवळील अशोक नगर येथील रहिवासी रामभाऊ नाना



सुरवसे वय ८४ यांचे बुधवार दि १७ जूलै रोजी सायंकाळी ४ वाजता वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बीड येथील भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत गुरूवारी सकाळी ९ वाजता अत्यंसस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.शिवाजी सुरवसे, अशोक सुरवसे, सुरेश सुरवसे,चंदु सुरवसे यांचे ते वडील होते.

# सद्गुरू वै. ह.भ.प सोपानकाका महाराज देहूकर वारकरी पुरस्कार सोहळा संपन्न

## ह.भ.प. आदिनाथ महाराज फपाळ मृदंग वादक सेवा पुरस्काराने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

ह.भ.प.आचार्य रामकृष्ण महाराज लहवितकर ट्रस्ट व देहूकर महाराज फड यांच्याद्वारे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील अतिशय गौरवशाली व सेवाभावी व्यक्तीचा वै.सद्गुरु सोपानकाका महाराज देहूकर यांच्या पुण्यस्मरणार्थ वारकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते

यावर्षी २०२४ चा सद्गुरु वै. ह.भ.प. सोपानकाका महाराज देहूकर सांप्रदायिक मृदंग वादक सेवा पुरस्कार माजलगावचे भूषण व गेल्या अनेक वर्षापासून ज्यांना




संपूर्ण महाराष्ट्रात कीर्तनकार म्हणून ओळखले जाते असे ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांना दिनांक १८ जुलै रोजी श्री देहूकर वाडा

## गणपतराव धोंडीराम येडके यांचे दुःखद निधन

**बीड । प्रतिनिधी**



येथील रहिवासी व सेवानिवृत्त नायब तहसीलदार श्री. गणपतराव धोंडीराम येडके यांचे १८ जुलै रोजी दुपारी ४ च्या सुमारास दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्या पश्चात तीन कन्या, जावई, एक मुलगा व नातवंडे असा परिवार आहे. सौ.के.एस.के. महाविद्यालयातील प्रा. सुरेश येडके यांचे ते वडील होत. बीड तहसील कार्यालयात कार्यरत असताना त्यांनी अनेक गोरगरीब जनतेची सेवा करून स्नेह व आपुलकीचे संबंध जपलेले आहेत. दि. १८ रोजी रात्री ९ वाजता संत भगवानबाबा प्रतिष्ठानजवळील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ओबीसीत रामराज्य आणण्यासाठी रामसेठ राठोड विधिमंडळात पोहोचणार ?

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले असून राज्य, रा तहष्ट्रीय पक्षासह वेगवेगळ्या समाजाच्या समूहातून सुद्धा अनेक जण तयारी करत असल्याचे चित्र दिसून येत असतानाच बंजारा समाजातून येणाऱ्या उद्योजक रामशेठ राठोड यांनीच ओबीसी



समाजातून विधानसभा निवडणूक लढवावी असा सूर आवळला जात आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजात रामच रामराज्य आणण्यासाठी विधिमंडळात जावेत अशी अपेक्षा मतदार व्यक्त करत आहे. रामसेठ राठोड हे माजलगाव तालुक्यातील बहुचर्तीत असलेल्या मोगरा येथील सामान्य कुटुंबातील असून गेली अनेक वर्षापासून राजकीय, सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. साधारण परिस्थितीशी दोन हात करून मुंबई या मायानगरीत उत्कृष्ट उद्योजक म्हणून नाव कमावलेले आहे. तसेच त्यांना विविध पुरस्कारानेही सन्मानित केलेले आहे. नायक प्रतिष्ठान निर्मिती करून त्या माध्यमातून हजारो व्यसनमुक्त युवकांची फळी निर्माण करण्यात त्यांनी यश मिळवलेले आहे. येत्या काळात मतदार संघातील बेरोजगार असलेल्या १००० तरुणांना उद्योजक बनवण्याचा त्यांनी विडा उचलला त्यामुळे अनेकाच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य लाभणार आहे. अशा रामशेठ राठोड यांच्यासारख्या कुशल नेतृत्वाची मतदार संघाला गरज आहे. माजलगाव मतदार संघात बंजारा, वंजारा, धनगर, मुस्लिम, दलित, गरजवंत मराठा व इतर लहान मोठ्या जाती एकत्र येऊन रामशेठ राठोड यांना विधिमंडळात पाठवण्याचा निर्णय ओबीसी समुदायाने घेतला असून राठोड यांनीच निवडणूक लढवावी अशी मागणी मतदार वर्ग करत आहे.

# वारकऱ्यांच्या वेशभुषेतील चिमुकल्यांनी लक्ष वेधले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

खोलेश्वरच्या शिशु विहारात चिमुकल्यांनी आषाढी एकादशी निमित्त विविध उपक्रम सादर केले.



याप्रसंगी विभागप्रमुख वर्षा मुंडे,शिशु विहारच्या शिक्षिका कल्याणी देशपांडे ,मनिषा खोगरे उपस्थित होत्या.

दिंडी काढण्यात आली सर्व चिमुकले वारकऱ्यांची वेशभूषेत होते.बाल चिमुकल्यानी टाळाच्या गजरात विठ्ठलाचे भजन सादर केले. फुगडी खेळण्याचा आनंद लुटला.मनीषा खोगरे यांनी चिमुकल्या वारकऱ्यांना भक्त पुंडलिकाची गोष्ट सांगितली. नंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्माईच्या मूर्तीची पूजा केली. सदरील कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षिका,शिक्षक यांनी परीश्रम घेतले.

# बर्दापूरच्या वेअर हाऊस मालकास अप्पर सत्र न्यायालयाचा दणका ; फेरविचार याचिका फेटाळली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील बर्दापूर येथील श्रीराम वेअर हाऊस येथून शेतकऱ्यांचा शेतमाल चोरीला गेल्याची घटना घडली होती. यानंतर विम्यापोटी आलेली लाखो रुपयांची रक्कम वेअर हाऊस मालकाने शेतकऱ्यांना न देता परस्पर हडप केल्याची फसवणुकीची तक्रार करत शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणात वेअर हाऊस चालकाने दाखल केलेली फेरविचार याचिका फेटाळून लावत न्यायालयाने वेअर हाऊस चालकास दणका दिला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, श्रीराम वेअर हाऊस येथून माल चोरीला गेल्यानंतर विमा कंपनीकडून लाखो रुपयांचा विमा मंजूर झाला. विम्यापोटी आलेले लाखो रुपये शेतकऱ्यांना न देता श्रीरंग द्वारकादास बजाज, श्यामसुंदर श्रीरंग बजाज, पुरुषोत्तम श्रीरंग बजाज आणि नितीन श्रीरंग बजाज यांनी परस्पर हडप करून शेतकऱ्यांची फसवणूक केली अशी तक्रार करून शेतकऱ्यांनी कलम ४२०, ४०६ व ३४ नुसार हे प्रकरण न्यायालयात लावून धरले. या प्रकरणी आरोपींनी अपर जिल्हा न्यायालयात फेरविचार याचिका दाखल केली होती. मागील सहा वर्षापासून शेतकरी न्यायासाठी लढा देत होते. न्यायालयाने सदरील याचिका फेटाळून ◀◀ पान ३ वर

# सुजाता कसबे यांचा संत कबीर नगर रत्न सन्मान चिन्हाने गौरव



अंबाजोगाई । प्रतिनिधी

कबीर नगर येथील रहिवासी विद्यार्थीनी सुजाता प्रकाश कसबे यांनी नुकतीच एमपीएससी परिक्षा उत्तीर्ण केली आहे. तिची नुकतीच सेल टॅक्स असिस्टंट पदी निवड झाली आहे. तिच्या या यशाचा सन्मान म्हणून तिचा परिसरातील युवकांच्या व नागरिकांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तिचा ॲड शाम तांगडे व ॲड संदीप थोरात यांच्या हस्ते पुष्पहार व संत कबीर नगर रत्न सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी ॲड शाम तांगडे , ॲड संदीप थोरात , राजाभाऊ पोटभरे , गोविंद मस्के आदींनी सुजाता कसबे यांना मंगल कामना दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन , प्रास्ताविक व आभार संयोजक स्वप्नील ओव्हाळ यांनी केले. या प्रसंगी परिसरातील विद्यार्थी , महीला व नागरी यांची उपस्थिती होती.

## लेखक, दिग्दर्शक संतोष जाधव यांना पितृशोक

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र भर सध्या लघु चित्रपट मध्ये दिग्दर्शक म्हणून चर्चेत असणारे संतोष जाधव यांना पितृशोक दि.१८जुलै रोजी सकाळी पहाटे झाला आहे संतोष जाधव यांचे पिताश्री बलभीम जाधव यांचे



हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने त्यांच्या राहत्या घरी चिचोंडी पाटील येथे दुःखद निधन झाले त्यांचे अंदाजे वय (७५)होते या दुःखद घटनेने साहित्यिक क्षेत्रातुन व शिक्षक वर्गातुन हळहळ व्यक्त होत आहे

# खडकतचे कत्तलखाने नष्ट: पण पोलिसांनी दिले अभय

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील खडकत हे गाव उत्तरेला अहमद नगर जिल्ह्याच्या सिमेलगत असल्याने केवळ शासकीय कामासाठी आष्टीशी निगडीत आहे.गावातील एका विशिष्ट समाजातील अनेक कुटूबांचा वर्षानुवर्ष जनावरांचा कत्तलखाना चालवण्याचा परंपरागत व्यवसाय आहे.याठिकाणी पर जिल्ह्यातील जनावरे कत्तलीसाठी राजरोस आणले जातात. मध्यंतरी गोरक्षक शिवकुमार स्वामी यांनी मुंबई वरून यंत्रणा हालून येथील कत्तलखाने उद्ध्वस्त केले.पण उध्वस्त केलेले कत्तलखाने आष्टी पोलिसांनी घरातून जणू काय परवानगी दिली आहे. चालवण्यास या कत्तलखान्याला अभय कोणाचे असा प्रश्न गोरक्ष करत आहेत.

भाजपा सरकारने केवळ गोहत्या नव्हे तर गोवंश हत्येचा कठोर कायदा केला.आणि संपूर्ण महाराष्ट्र भर या कोठर कायद्याची अमंलबजावणी केली.अनेक ठिकाणी गुन्हे दाखल झाले.परंतु खडकत हे गाव महाराष्ट्रात नसून दुस–या राज्यात असल्यासारखे या ठिकाणी वातावरण आहे. याठिकाणी जनावरांचे मांस शितकरण करुन डबा बंद केले जाते.त्यासाठी मोठे शेड उभे केले असून परप्रांतातील महिला आणि पुरुषांच्या किमान ५० जोडपी कामाला आहेत.या शीतकरण गृहाच्या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांना प्रवेश बंदी असून, परिसरात रानटी कुत्रे सोडलेले असतात त्यांच्या भितीने कोणीही जवळपासही फिरकत नसल्याने,''अंदर की बात''कुणालाही समजत नाही. मध्यंतरी गोरक्षक शिवकुमार स्वामी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यामार्फत यंत्रणा हलवत येथील कत्तलखाने नष्ट केले.परंतु खडकत गावात वेगवेगळ्या घरगुती उद्योगासारखे जनावरे कापण्याचा व्यवसाय असून,

गावातील जुणे पुराणे ओसाड झालेले वाडे मोठी किमंत देऊन विकत घेण्यात आले आहेत.या ठिकाणी आठवड्यात एखाद्या दिवसाचा आपवाद वगळता दररोज प्रत्येक ठिकाणी किमान दहा ते पंधरा जनावरे कापली जातात.तेथून परराज्यात व परदेशात विक्रीसाठी पाठविले जातात.मध्यतंरी याठिकाणी बीड पोलिस अधिक्षकांच्या पथकाने छापा मारुन जनावरांचे जप्त करुन या वर्षात दोन कारवाई केल्या.आष्टी पोलिस किंवा आष्टी उपविभागीय अधिकारी नेहमी या अवैध रित्या चालू असलेल्या कत्तलखान्याकडे का दुर्लक्ष करत आहेत.याचा मात्र,उलगडा होत नाही.गावातील बहुजन समाजाचे नागरीक या कत्तलखान्यामुळे निर्माण होणा–या दुर्गंधीमुळे हैराण आहेत.परंतु पक्रार करण्यास राजकीय भक्कम आधार नसल्याने पुढे येत नाहीत.तसेच तक्रार करणा–या नागरिकांचे नावे पोलिसांकडून संबंधितांना सांगितली जातात.त्यामुळे तक्रार कर्त्यांला एकटे गाठूण दमबाजी केली जात असल्यामुळे पुढे येण्यास कोणीही धजावत नसल्याने मोठी लोकसंख्या असलेले गाव तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करत आहे. खडकतचे कत्तल व्यावसायिक चतुर असून दिवसा सर्व ठिकाणी सर्व बंद असल्याचे भासवतात आणि रात्र सुरु झाली की,कत्तलखाने आणि शीतगृहातील कामे चालू होतात.अशी माहिती ग्रामस्थ देतात.त्यामुळे एकदा पोलिस अधिक्षकांनी स्वत; कोणत्याही कनिष्ठ अधिका–यांवर विश्वास न ठेवता या ठिकाणी भेट देऊन खात्री करावी अशी मागणी खडकत ग्रामस्थांनची आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मनोरमा खेडकरला कोर्टाने दिली तीन दिवसांची पोलिस कोठडी; धमकी प्रकरण पडलं महागात

**पुणे । प्रतिनिधी**

ट्रेनी आयएएस पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकरला सकाळी पुणे ग्रामीण पोलिसांनी महाडमधून ताब्यात घेतलं. स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करुन पोलिस तिला पुण्याला घेऊन आले. त्यानंतर सर्व प्रक्रिया पुर्ण करून तिची वैद्यकिय तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी मनोरमा खेडकरलाकोर्टात हजर केलं होतं. पोलिसांनी कोर्टात मनोरमा खेडकरला ७ दिवसांची पोलिस कोठडी द्यावी अशी मागणी केलेली आहे. मात्र, कोर्टाने मनोरमा खेडकरला तीन दिवस पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे



मनोरमा खेडकरचे काही दिवसांपूर्वी स्थानिक शेतकऱ्यांना धमकावतानाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाले होते. पुणे पोलिसांशी देखील तिने हुज्जत घातली होती. गेल्या काही दिवसांपासून मनोरमा खेडकरचा तपास पोलिस करत होते. आज अखेर पोलिसांनी मनोरमा खेडकरला महाड मधील हॉटेल मधून अटक केली आहे. स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करुन पोलिस त्यांना पुण्याला घेऊन आले. त्यानंतर सर्व प्रक्रिया पुर्ण करून तिची वैद्यकिय तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर कोर्टात पोलिसांनी मनोरमा खेडकरला ७ दिवसांची पोलिस कोठडी द्यावी अशी मागणी केलेली होती. मात्र, कोर्टाने मनोरमा खेडकरला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

नवीन कलम वाढ झाल्यामुळे मनोरमा खेडकरच्या अडचणीत वाढण्याची शक्यता

मनोरमा खेडकरवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे कलम ३०७ वाढवण्यात आले आहे. आधी फक्त शेतकऱ्यांना धमकावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. नवीन कलम वाढ झाल्यामुळे मनोरमा खेडकरच्या अडचणीत वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता या संपूर्ण प्रकरणामध्ये आता मनोरमा खेडकरच्या अडचणी वाढल्या आहेत.

पोलिसांनी मनोरमा खेडकरला ७ दिवसांची पोलिस कोठडी मागताना पोलिसांनी अनेक कारणे सांगितलेली आहेत. त्यामध्ये मनोरमा खेडकरसोबत तिचे पती दिलीप खेडकर यांच्यावरती देखील गुन्हा दाखल आहे, मात्र ते देखील गायब आहेत त्यांचाही पोलिस शोध घेत आहेत. त्यांच्याबाबतची माहिती पोलिसांना हवी आहे. तर शेतकऱ्यांना धमकावताना वापरलेलं पिस्तुल कुठून आलं आहे, त्याची माहिती देखील पोलिसांना हवी आहे. त्याचबरोबर मुळशी तालुक्यामध्ये खेडकर कुटुंबाची नेमकी किती जमीन आहे यासाह इतर माहिती घेण्यासाठी पोलिसांनी ७ दिवसांची पोलिस कोठडी मागितली आहे. त्यावर कोर्ट काय निर्णय देणार याकडे लक्ष लागलं आहे.

# वाईन शॉप परवान्याचे आमिष दाखवून १ कोटीला गंडा, पोलीस अधिकाऱ्यासह ९ जणांवर गुन्हा

**पाचगणी । प्रतिनिधी**

महाबळेश्वर शहरातीस हॉटेल व्यावसायिकाला वाईन शॉप परवाना मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक केल्याची घटना सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे घडली आहे. हेमंत बाळकृष्ण साळवी असे या हॉटेल व्यावसायिकाचे नाव आहे. याप्रकरणी वाई पोलिस ठाण्यात राज्य गुन्हे शाखेचे पुणे विभागाचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक श्रीकांत कोल्हापुरे यांच्यासह ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, या घटनेप्रकरणी पुणे विभाग आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिस उपअधीक्षक देवश्री मोहिते यांनी सोमवारी वाई पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. यामध्ये महाबळेश्वर (साबणे रोड) येथील हॉटेल व्यावसायिक हेमंत बाळकृष्ण साळवी यांना राज्य गुन्हे अन्वेषण शाखा (पुणे विभाग) अतिरिक्त पोलिस अधीक्षक श्रीकांत कोल्हापुरे, हनुमंत विष्णुदास मुंडे, विवेक पंडित यांनी वाइन शॉपचा परवाना मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी एकूण २.५ कोटी रुपये खर्च येत असल्याचे सांगून वेळोवेळी संजय बाजीराव साळुंखे यांच्या मध्यस्थीने एकूण रक्कम १ कोटी ५० लाख रुपये रोख व चेकने वाई येथे विविध ठिकाणी स्वीकारली. परंतु त्यांना आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा परवाना मिळाला नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर संजय सांळुखे यांनी अतिरिक्त पोलिस महासंचालक, पुणे यांच्याकडे तक्रार अर्ज केला होता. या अर्जाच्या चौकशीनंतर हा गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात




आला आहे. त्यानुसार श्रीकांत कोल्हापुरे व हनुमंत मुंडे यांच्यासह नऊ जणांवर आपापसांत संगनमत करून शासकीय वाहनाचे लॉक बुकमध्ये खोट्या नोंदी करून, हॉटेल व्यावसायिक हेमंत साळवी यांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमध्ये, श्रीकांत कोल्हापुरे, हनुमंत विष्णुदास मुंडे, विवेक पंडित, नीलेश पटेल, अभिमन्यू देडगे, राजन सूर्यभान सोनवणे, शकील हाजी मकबूल सय्यद, श्रीमती नजमा शेख व बाळू पुरी यांचा समावेश आहे.

## वारकऱ्यांना घेऊन जाणाऱ्या टेम्पोचा सिंहगड घाटात अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

साताऱ्याहून वारकऱ्यांना घेऊन आलेल्या ट्रेम्पोचा गुरूवारी दुपारी सिंहगडाच्या घट रस्त्यावर अपघात झाला. घाटातील धोकादायक वळण ठरलेल्या ११ हजार पॉइंटजवळ टेम्पो दरीच्या दिशेने कोसळला, मात्र मोठ्या दगडी कठड्यावर मागील चाके अडकल्याने जिवीतहानी टळली.

वारी पूर्ण करून परतीच्या मार्गावर निघालेले २५ वारकरी सहकुटुंब सिंहगडावर पर्यटनासाठी आले होते. यामध्ये लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकही होते. यातील काही वारकरी डोणजे गोळेवाडी भागातील होते. घाटातून खाली येताना अकरा हजार पॉइंटजवळ वाहनचालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि काही कळण्यापूर्वीच ट्रेम्पो दरीच्या दिशेने कोसळला. मात्र दगडाच्या कठड्यांमध्ये मागील चाके अडकली. त्यामुळे टेम्पो अडकला. प्रशासन आणि गावकऱ्यांनी जेसीबीच्या मदतीने टेम्पोला दरीतून वर काढले

# बिबट्याने पिंजऱ्यातून उडी मारल्याने उडाला थरकाप

मंचर, ता १८: तांबडेमळा (ता.आंबेगाव) येथे विहिरीत पडलेला बिबट्या पिंजऱ्यातून बाहेर काढत असताना अचानकपणे दरवाजा उघडला. यामुळे बिबट्याने विहिरीतून वर येण्यासाठी उडी मारण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे तो विहिरीत कोसळला. अंगाचा थरकाप उडवणारी ही घटना गुरुवारी (ता. १८) सकाळी घडली आहे.

विहिरीत पडलेला बिबट्या पिंजऱ्यात जाऊन बसला. दोराच्या साह्याने वन कर्मचारी व काही नागरिक पिंजरा वर ओढत होते. विहिरीच्या काठापासून आतील बाजूस चार ते पाच फुटांवर पिंजरा आल्यानंतर अनवधानाने दरवाज्याला लावलेला दोर ओढला गेला. त्यामुळे पिंजऱ्यातून बाहेर पडलेल्या बिबट्याने झेप टाकून विहिरीच्या वर येण्याचा प्रयत्न केला. प्रसंगावधान राखून वनरक्षक रईस मोमीन यांनी आरडाओरड केला. तसेच झेप घेतलेला भाग मुरमाचा असल्याने पकड व्यवस्थित न बसल्याने पुन्हा विहिरीत बिबट्या कोसळला. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्यामुळे वनखात्याचे कर्मचारी व ग्रामस्थांनी सुटकेचा विश्वास सोडला.

तांबडे मळा येथे गेल्या काही दिवसापासून बिबट्याचा उपद्रव वाढला असून, आतापर्यंत त्याने अनेक शेळ्या व कुत्री फस्त केली आहेत. या भागात भीतीचे वातावरण आहे.



गुरुवारी मध्यरात्री कुत्र्याचा पाठलाग करत असताना विहीर लक्षात आली नाही. त्यामुळे बिबट्या विहिरीत कोसळल्याचा अंदाज वन खात्याने व्यक्त केला आहे. विहिरीमध्ये किती पाणी आहे हे पाहत असताना शेतकरी मारुती मल्हारी तांबडे यांनी बिबट्याला पाहिले. बिबट्या व शेतकऱ्याची नजरा नजर होताच बिबट्याने डरकाळी फोडली. ही माहिती आजूबाजूचे शेतकरी व गावकऱ्यांना समजल्यानंतर त्यांनी मंचर वनपरिक्षेत्राधिकारी स्मिता राजहंस यांच्याशी संपर्क केला. त्यांनी ताबडतोब रईस मोमीन, मिलिंद टेमकर, नवीन सोनवणे, विलास भोर, मनोज तळेकर, धनंजय मेंगडे, ऋषिकेश कोकणे यांचे रेस्क्यू पथक घटनास्थळी पाठवले.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा विहिरीत सोडल्यानंतर बिबट्या पिंजऱ्यात जाऊन बसला. तीन-चार दोर लावून पिंजरा विहिरीतून बाहेर काढत असतानाच अनवधानाने दरवाजाचा दोर ओढला गेला. त्यामुळे दरवाजा उघडला जाताच बिबट्याने विहिरीच्या कठड्याच्या दिशेने झेप घेण्याचा प्रयत्न केला. हे पाहून अनेकांनी तेथून पळ काढला. पण रईस मोमीन यांनी समय सूचकता बाळगून आरडाओरड करून बिबट्याला हुसकले .त्यामुळे बिबट्या पुन्हा विहिरीत कोसळला. परिणामतः मोठी दुर्घटना टळली असल्याचे प्रत्यक्ष घटना पाहणाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, नर जातीचा सहा वर्षाचा बिबट्या आहे. वैद्यकीय तपासणीसाठी माणिक डोह बिबट निवारण केंद्रामध्ये बिबट्याला पाठविण्यात आले आहे, असे राजहंस यांनी सांगितले.

# निकृष्ट दर्जाची तक्रार होताच रस्ता उखडला, नवीन रस्ता करणार

**दौंड । प्रतिनिधी**

देऊळगावगाडा (ता. दौंड) हद्दीमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजनेंतर्गत सुरू असलेले रस्त्याचे काम निकृष्ट होत असल्याने याबाबत दै. 'पुढारी'ने वृत्त प्रसिध्द केल्यानंतर अधिकार्यांनी या कामाची पाहणी केली. बुधवारी (दि. १७) हा निकृष्ट दर्जाचा रस्ता जेसीबीच्या साहाय्याने उखडण्यात आला आहे.

देऊळगावगाडा ते विठ्ठलवाडी-माळवाडी रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजनेतून सुरू आहे. ठेकेदाराकडून हे काम निकृष्ट होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. सुमारे ३ कोटी ३० लाख रुपये किमतीचे संपूर्ण काम असून, ५ वर्षे देखभाल दुरुस्तीसाठी जवळपास २४ लाख रुपये खर्च नियोजित करण्यात आला आहे. या रस्त्याचे काम मे. नागेश्वर कन्स्ट्रक्शन, पाटस यांना देण्यात आले आहे. रस्त्याच्या कामाची सुरुवात ऑगस्ट २०२३ रोजी सुरू करणे व काम पूर्ण करण्याची अंतिम तारीख ऑगस्ट २०२४ आहे

विठ्ठलवाडी येथील स्थानिकांनी सिमेंट रस्ता तयार केल्यानंतर त्यावर दोन दिवस पाणी मारले नाही. दोन दिवसांनंतर पाण्याचा टँकर या रस्त्यावर पाणी मारण्यासाठी आणला गेला असता केवळ दोन ते तीन दिवसांतच रस्त्याला भेगा पडल्या होत्या. विठ्ठलवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर जवळपास ४० ते ५० फूट लांबीच्या भेगा पडल्याने या रस्त्यावरून भविष्यात शेतकर्यांचे ट्रॅक्टर, जेसीबी, मालवाहू वाहने जाणार असल्याने आत्ताच रस्ता निकृष्ट होत असल्याने वर्षभर हा रस्ता टिकणार तरी कसा? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला होता. या रस्त्याचे पुन्हा काम करण्यात येणार आहे. शासनाकडून ठरलेल्या दर्जाप्रमाणे काम होत असते. काही तांत्रिक अडचणींमुळे या रस्त्याला भेगा पडल्या होत्या. रस्त्याबाबत त्रुटी मान्य आहेत व त्यामुळेच तत्काळ रस्ता उखडून नव्याने उच्च प्रतीचा रस्ता तयार करण्याचे नियोजन केलेले आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये नागेश्वर कन्स्ट्रक्शन चुकीच्या पद्धतीने काम करणार नाही, अशी ग्वाही नागेश्वर कन्स्ट्रक्शनचे ठेकेदार नागेश बोबडे यांनी दिली.

# लालपरी सीएनजीवर धावणार

## शिरूर, राजगुरूनगर, बारामती, सासवड आगारांत सुरूवात

**पुणे । प्रतिनिधी**

डीझेलच्या वाढत्या किमती, तुटवडा आणि होणारे प्रदूषण यामुळे डीझेलवरील धावणारी लालपरी (एसटी बस) आता सीएनजीवर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाकडून घेण्यात आला आहे.

त्यानुसार पहिल्या टप्प्यात पुणे विभागातील शिरूर, राजगुरूनगर, बारामती आणि सासवड या चार आगारांतील एकूण १३२ लालपरी बसना सीएनजीत रुपांतरित करण्यात आले आहे, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.पुणे विभागात एकूण १४ आगार असून, दररोज हजारो प्रवासी एसटीने प्रवास करतात. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यांसह पर्यटनासाठी प्रवाशांची हक्काची



सेवा असलेली एसटी खर्या अर्थाने जीवनवाहिनी ठरत आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यातील अनेक बस जुन्या झाल्या आहेत. त्यामुळे महामंडळाने नव्याने इलेक्ट्रिक बस घेण्यावर जास्त भर दिल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या जुन्या बस डीझेलवर चालणाऱ्या असून, डीझेलच्या वाढत्या किमतीमुळे महामंडळाचा सगळ्यात जास्त खर्च इंधनावर होत असल्याचे दिसते. त्यामुळे आर्थिक तूट निर्माण होते. त्याला पर्यायी व्यवस्था म्हणून डीझेलवरील लालपरी सीएनजीवर करण्यात येणार आहे. त्याचा एसटी महामंडळाला फायदा होत असून, येत्या वर्षभरात पुणे विभागातील सर्व डीझेलच्या एसटी बस या सीएनजीवर रुपांतरित करण्यात येणार आहेत.

# तळीरामांनी चालविली पीएमपी बस; प्रवाशांच्या जिवाचा थरकाप

**पिंपरी । प्रतिनिधी**

दोन तळीरामांनी पीएमपी बस थांबवून चालकाला दमदाटी करून चालत्या बसचे स्टेअरिंग हातात घेऊन बस वाकडी तिकडी चालवली. यावेळी बसची वाहनांना व नागरिकांना धडक बसली. यामुळे बसमधील प्रवाशांच्या जिवाचा थरकाप उडाला. ही घटना बुधवारी (दि. १७) दुपारी सव्वा एक वाजताच्या सुमारास भोसरी येथे घडली.

सचिन गुणाजी पारधे (वय ४४, रा. पुणे स्टेशन) यांनी बुधवारी (दि. १७) याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संतोष जाधव (वय ४०), जितेश रमेश राठोड (वय ३६, रा. महाळुंगे, चाकण) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी दारूच्या नशेत पीएमपी बसला हात दाखवला. बसमध्ये चढून दोघांनी बस चालक सुरज सुखलाल काळे (वय २४) यांना शिवीगाळ केली. चालकाच्या केबिन मध्ये जाऊन आरडाओरडा करून बसचे स्टेअरिंग आरोपींनी त्यांच्या हातात घेतले. आम्ही सुद्धा बस चालक आहोत, आम्हाला शिकवू नकोस, असे म्हणून आरोपींनी बस वाकडीतिकडी चालवत वाहनांना व नागरिकांना धडक दिली. फिर्यादी यांनी आरोपींना अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांना शिवीगाळ करून नखे ओरखडून जखमी केले. या घटनेत बसमधील प्रवासी घाबरले होते.

# हातात पिस्तुल घेवून 'रिल्स' बनवणाऱ्यांना अटक

**पिंपरी । प्रतिनिधी**

सोशल मिडियावर हातात पिस्तूल घेवून रिल्स बनवणाऱ्या दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तर, अन्य तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने बुधवारी (दि. १७) चिखली येथे ही कारवाई केली. कुणाल रमेश साठे (वय.२६, रा. मोरेवस्ती, चिखली) आणि त्याचा अल्पवयीन साथीदार या दोघांना अटक करण्यात आली आहे. तर, यश कांबळे (रा. टॉवर लाईन, चिखली), सुशील गोरे उर्फ बारक्या (रा. ओटास्कीम, निगडी) आणि रोहित मिश्रा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी खंडणी विरोधी पथकातील पोलीस अंमलदार आशिष बोटके यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेची पथके सराईत गुन्हेगारांच्या सोशल मीडियावर 'वॉच' ठेवून आहेत. दरम्यान, खंडणी विरोधी पथकातील पोलीस अंमलदार आशिष बोटके यांना इन्स्टाग्रामवर हातात पिस्तुल घेऊन दहशत पसरवताना एक व्हिडीओ दिसला. त्यानुसार, पथकाने आरोपींचा शोध सुरू केला. दरम्यान, पथकाला आरोपी मोरेवस्ती, चिखली येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता आरोपी कुणाल साठे याचे नाव समोर आले. पोलिसांनी कुणाल साठेलाही बेड्या ठोकल्या.

आरोपी यश कांबळे हा दुचाकीवर पाठीमागे बसून पिस्तुल हातात घेऊन दहशत पसरवत असल्याचे आरोपींनी सांगितले. त्यांच्या पाठीमागे असलेल्या दुचाकीवरून हा व्हिडीओ बनवल्याची कबुली दोघांनी दिली. आरोपींवर चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना चिखली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलीस ठाण्यातही बनवले रील्स

आरोपी रोहित मिश्रा याच्या इन्स्टाग्रामवर तब्बल ९० व्हिडिओ पोस्ट आहेत. २०१९ पासून तो सोशल मीडिया वापरत आहे. यामध्ये अनेक चित्रपटातील गुन्हेगारीचे संवाद वापरून रिल्स बनवण्यात आले आहेत. यातील विशेष बाब म्हणजे नवी मुंबईतील वाशी पोलीस ठाण्याच्या एका खोलीतही एक रिल्स बनवला आहे. रिल्सला कॅप्शन देखील देण्यात आले आहे.

## सासवड येथे गोळीबारात आईस्क्रीम विक्रेता गंभीर जखमी

सासवड: : पुरंदर तालुक्यातील सासवड येथे गोळीबारामध्ये एक जण गंभीररित्या जखमी झाला. या संदर्भात स्थानिक व प्रत्यक्षदर्शी लोकांनी दिलेल्या माहितीनुसार सासवड येथील बस स्थानकासमोर (दि.१८) दुपारी ३.५० च्या दरम्यान ही घटना घडली. तीन हल्लेखोरांनी हा हल्ला केला. यात ४१ वर्षीय राहुल नामदेव टिळेकर हे गंभीररित्या जखमी झाले आहेत. त्यांना पुणे येथील रुग्णालयात दाखल केले आहे.सासवड एसटी बस स्थानकासमोर टिळेकर हे आईस्क्रीम विक्रीचा व्यवसाय करतात, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटना घडल्यानंतर सासवड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पुढील तपास सासवड पोलीस करत आहेत.

# राज्यस्तरीय खरीप पीक स्पर्धेत शिरूरची बाजी

गुनाट, ता. १८ : सन २०२३ राज्यस्तरीय खरीप पीक स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये शिरूर तालुक्याने बाजी मारली असून, चव्हाणवाडी (ता. शिरूर) येथील ताराबाई बांदल यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर गुनाट येथील योगेश गाडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

ताराबाई बांदल चव्हाण यांनी प्रतिहेक्टरी ६४. ३८ क्विंटल तर योगेश गाडे यांनी ५८.३२ प्रतिहेक्टरी क्विंटल एवढे विक्रमी पिकांचे उत्पादन घेतले. खरीप पिकांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी व शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी दरवर्षी राज्य कृषी विभाग खरीप हंगामात पीक स्पर्धांचे आयोजन करत असते. यामध्ये तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय असे तीन विभाग असतात. २०२३ च्या खरीप हंगामातील बाजरी पीक स्पर्धेत चव्हाण आणि योगेश गाडे यांनी सहभाग नोंदवला होता. तालुकास्तरीय स्पर्धेतही याच दोघांनी बाजी मारल्याने त्यांची थेट राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली होती. संपूर्ण राज्याच्या सहभागी स्पर्धकांतही चव्हाण व गाडे यांचेच उत्पादन उच्चांकी निघाले.

शेतकऱ्यांकडून शेतात विविध प्रयोग राबविण्यात येऊन उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पीक स्पर्धा राबविण्यात येते. खरीप हंगाम २०२३ मध्ये बाजरी पिकात शिरूर तालुक्यातील ताराबाई बांदल व योगेश गाडे या २ प्रयोगशील शेतकऱ्यांचा राज्य स्तरावर अनुक्रमे प्रथम व तृतीय क्रमांक आल्याने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. चालू वर्षीही पीक स्पर्धेत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. मूग पिकासाठी ३१ जुलै २०२४ पर्यंत तर बाजरी व सोयाबीन पिकासाठी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत शेतकऱ्यांनी सहभाग अर्ज कृषी विभागात सादर करावे.

– सिध्देश ढवळे, तालुका कृषी अधिकारी. शिरूर.

# माजी सभापतींसह नसरापूर ग्रामस्थ उतरले रस्त्यावर

नसरापूर : नसरापूर-वेल्हा या रस्त्याचे काम ठेकेदाराने थांबवल्याने वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना रोजच करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर भोरच्या माजी सभापतींसह नसरापूर ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी भर पावसात रस्त्यामध्येच ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. १५ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

नसरापूर (ता. भोर) गावातील मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी करत भोर पंचायत समितीचे माजी सभापती लहुनाना शेलार यांनी भररस्त्यात ठिय्या मांडला. या वेळी ज्येष्ठ यशवंतराव कदम, माजी संचालक ज्ञानेश्वर झोरे, नसरापूरचे उपसरपंच सुधीर वाल्हेकर, सदस्य संदीप कदम, नामदेव चव्हाण, व्यापारी संघटनेचे प्रदीप राशिनकर, प्रकाश चाळेकर, सोमनाथ उकिरडे, राजू मिठाले, दत्तात्रय वाल्हेकर, सुरेश दळवी, राजू राशिनकर, आबा शेटे, संतोष पवार, समीर शिळीमकर, शशिकांत कदम, विजय गयावळ, दीपक भदे, किरण बांदल यांच्यासह शेकडो ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता. या वेळी संबंधित सार्वजनिक बांधकाम व ठेकेदाराच्या कामकाजाविषयी तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता पी. जी. गाडे यांनी घटनास्थळी दाखल झाल्यानंतर ग्रामस्थांनी त्यांना घेराव घालून भोंगळ कारभाराबाबत जाब विचारला. तसेच लहुनाना शेलार, यशवंतराव कदम, ज्ञानेश्वर झोरे, सुधीर वाल्हेकर, संदीप कदम, नामदेव चव्हाण, आबा शेटे यांनी अधिकार्यांना प्रश्नांची सरबत्ती केली. मात्र अधिकार्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही.दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकार्यांचे नसरापूर रस्त्याचे काम करणार्या मे. इंडिकोन ठेकेदारावर कोणताच अंकुश नसल्याने रस्त्याचे काम दर्जाहीन होत असल्याचे आरोप करून मागील आठवड्यात ग्रामस्थांनी काम बंद पाडले होते. ठेकेदाराकडून बजेटनुसार काम होत नसल्याचेदेखील ग्रामस्थांनी आरोप केले आले. काम पूर्ण करण्याची लेखी पत्र दिल्यानंतर ठिय्या आंदोलन तीन तासाने मागे घेण्यात आले. घटनास्थळी राजगड पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला होता.

## सीए डॉ. एस. बी. झावरे यांना जीवनगौरव पुरस्कार

पुणे : ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते सनदी लेखापाल डॉ. एस. बी. झावरे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सनदी लेखापाल म्हणून तसेच शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात पाच दशकांहून अधिक काळ भरीव योगदान दिल्याबद्दल झावरे यांना सन्मानित करण्यात आले.

गौरव समितीचे उपाध्यक्ष धनंजय जोशी, सचिव यशवंत कासार, खजिनदार अभिषेक धामणे यांच्यासह ड. अविनाश आव्हाड, डॉ. एम. एस. जाधव, सर्वेश जोशी, जी. एस. थोरात, काशिनाथ पाठारे, किसन गारगोटे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. झावरे यांच्या यशस्वी कारकिर्दीला ५२ वर्षे पूर्ण झाली आहेत. 'दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया'चे (आयसीएआय) सेंट्रल कौन्सिल मेंबर म्हणून अनेक पातळ्यांवर झावरे यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले. एशियन ओसिएनिएन स्टॅण्डर्ड सेटर्स ग्रुपचे (एओएसएसजी) अध्यक्ष, 'आयसीएआय'च्या अकौंटिंग स्टॅण्डर्ड बोर्डचे (एएसबी) अध्यक्ष, नॅशनल ड्व्हायझरी कमिटी ऑन अकाउंटिंग स्टॅण्डर्डचे विशेष निमंत्रित आदी पदांवर त्यांनी काम केले आहे.